cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–६३ | शनिवार दि.२३ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रुपये

## संपादकीय

### भ्रष्टाचाराच्या दलदलीत अडकलेली व्यवस्था

देशातील सरकारी कर्मचारी आणि अधिकारी हे शासन व्यवस्थेचे कणा मानले जातात. शासनाच्या योजना राबविणे, नागरिकांना सेवा पुरविणे, कायदे आणि नियमांची अंमलबजावणी करणे, विकासकामे पूर्ण करणे, जनतेच्या करातून जमा झालेल्या पैशांचा योग्य वापर करणे, ही अत्यंत जबाबदारीची कामे त्यांच्या खांद्यावर असतात. त्यामुळेच सरकार त्यांना चांगले वेतन, महागाई भत्ता, निवास, वाहन, वैद्यकीय सुविधा, निवृत्ती वेतन यांसारख्या अनेक सवलती देते.

# डिझेलसाठी सातबारा सक्ती ? सरकार आक्रमक

## सातबारा मागाल तर कारवाई ; कृषिमंत्र्यांचा पेट्रोल पंपांना इशारा, चौकशीचे आदेश

मुंबई । प्रतिनिधी

**मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांत डिझेल मिळवण्यासाठी शेतकऱ्यांची पेट्रोल पंपांवर मोठी गर्दी होत असून, काही ठिकाणी परिस्थिती गंभीर बनली आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर मशागतीची कामे वेगाने सुरू असताना डिझेलची वाढती मागणी आणि टंचाईच्या अफवांमुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर पंपांकडे धाव घेत आहेत. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना हातात कॅन घेऊन १० ते १२ तास रांगेत उभे राहावे लागत असल्याचे चित्र दिसत आहे.**

परभणीसह काही भागांत डिझेल देताना शेतकऱ्यांकडे सातबारा उतारा मागितला जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. सातबारा दाखवल्याशिवाय कॅनमध्ये डिझेल देण्यात येत नसल्याने शेतकऱ्यांनी

◀◀ पान २ वर



### “ शेतकऱ्यांना प्राधान्याने डिझेल उपलब्ध करुन द्या–अजित नवले


मुख्यमंत्र्यांनी खरीप हंगामाच्या तयारीसाठी बैठक घेतली असली तरी ग्रामीण पातळीवर याबाबत पुरेशा प्रमाणात गांभीर्य प्रशासनाला आलेले नाही, हेच यातून दिसत असल्याची टीका अखिल भारतीय किसान सभेचे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी केली आहे. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी ही बाब अत्यंत गांभीर्याने घ्यावी. कुठेही शेतकऱ्यांना डिझेलसाठी सातबारा आणि कोणतीही अट लावू नये. तसेच शेतकऱ्यांना प्राधान्याने शेती अवजारांसाठी डिझेल उपलब्ध करुन देण्याची तसदी संपूर्ण महाराष्ट्राभर जिल्हाधिकारी आणि पुरवठा अधिकाऱ्यांनी घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## गो-तस्करांना आता थेट मोक्का लागणार !

### फडणवीस सरकारने घेतला कठोर निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील गुरांची अवैध तस्करी, प्राण्यांची बेकायदेशीर वाहतूक आणि अनधिकृत कत्तलखान्यांना पूर्णपणे आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सरकारने अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. गृह विभागाने जारी केलेल्या नवीन परिपत्रकानुसार, गुरांची तस्करी आणि बेकायदेशीर कत्तलीच्या कृत्यांमध्ये वारंवार सहभागी असणाऱ्या टोळ्या आणि संघटित संस्थांवर आता थेट 'महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्या'अंतर्गत



(मकोका) गुन्हा दाखल करून कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश पोलीस व प्रशासनाला देण्यात आले आहेत.

विविध सामाजिक आणि धार्मिक संस्थांकडून मिळणाऱ्या निवेदने आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांची दखल घेत सरकारने हा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे समर्थन करताना सरकारने संविधानाच्या कलम

◀◀ पान २ वर

### स्वतंत्र 'नोडल अधिकारी' नियुक्त

प्रशासकीय समन्वयासाठी प्रत्येक संबंधित विभागात स्वतंत्र 'नोडल अधिकारी' नियुक्त केले जातील. नागरिकांच्या सुविधेसाठी, आता '११२' या आपत्कालीन क्रमांकावर गुरांची तस्करी किंवा अनधिकृत कत्तलखान्यांबाबत तक्रार प्राप्त झाल्यास, पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून कारवाई करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध

### छगन भुजबळ यांची माहिती ; भीतीपोटी अनावश्यक खरेदी टाळा

मुंबई । प्रतिनिधी

**गेल्या काही दिवसांपासून आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे पेट्रोल–डिझेलच्या दरांमध्ये चढ–उतार पाहायला मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यात इंधनटंचाई निर्माण होण्याच्या अफवा पसरवल्या जात आहेत. मात्र, महाराष्ट्रात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.**

माध्यमांशी संवाद साधताना छगन भुजबळ म्हणाले की, राज्यात कोणत्याही प्रकारची इंधनटंचाई नाही. त्यामुळे नागरिकांनी भीतीपोटी अतिरिक्त पेट्रोल–डिझेल खरेदी करून साठवणूक करू नये. गेल्या काही दिवसांत अनेक ठिकाणी गरजेपेक्षा अधिक इंधन खरेदी होत



असल्याचे निदर्शनास आले असून, त्यामुळे मे महिन्यात नेहमीच्या तुलनेत सुमारे २० टक्के अधिक पेट्रोल–डिझेलची विक्री झाल्याची माहिती दिली. पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले की, "देशाचे पंतप्रधान, केंद्र सरकार आणि राज्य सरकार प्रत्येक नागरिकाला पुरेशा प्रमाणात इंधन

◀◀ पान २ वर

## तत्कालीन जिल्हाधिकारी पाठक अखेर निलंबीत

बीड । प्रतिनिधी

**कथित भूसंपादन मावेजा घोटाळा प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असलेल्या तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठकच्या अडचणी आणखीच वाढल्या आहेत. भूसंपादन घोटाळा प्रकरणात झालेली अटक आणि त्यानंतर मिळालेली कोठडी यामुळे राज्य शासनाने अविनाश पाठकवर अखेर निलंबनाची कारवाई केली आहे.**



शिवाजीनगर पोलीस ठाण्यात कथित भूसंपादन मावेजा घोटाळा प्रकरणी दाखल गुन्ह्यात ७ मे रोजी बीडचे माजी जिल्हाधिकारी म्हणून राहिलेल्या अविनाश पाठकला अटक करण्यात आली होती. बीडच्या न्यायालयाने सुरुवातीला अविनाश पाठकला पोलीस कोठडी सुनावली तर सध्या पाठक न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. सनदी अधिकाऱ्याला कोठडी देण्यात आल्याने राज्य शासनाने पुढील कारवाई केली असून, अविनाश पाठकच्या निलंबनाचे आदेश काढले. विशेषता पाठक हे आजही कारागृहामध्ये आहेत. २९ मे रोजी त्यांची न्यायालयीन कोठडी पूर्ण होत आहे. त्यापूर्वीच त्यांनी जामीनसाठी अर्ज दाखल केला मात्र तो फेटाळण्यात आला. दरम्यान, धुळे – सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील दोनशे कोटीपेक्षा अधिकचा घोटाळा असल्याने त्यांना झालेली अटक याची शासनाने दखल घेत त्यांना निलंबीत

◀◀ पान २ वर

## ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करण्यासाठी ना.पंकजाताई मुंडे यांनी घेतला आढावा

मुंबई । प्रतिनिधी

पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे तातडीने भरून प्रशासकीय कामाला गती देण्याचे व ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा अधिक आधुनिक करण्याचे निर्देश पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज दिले. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असलेल्या पशुसंवर्धन



क्षेत्राला अधिक सक्षम करण्यासाठी व पशुपालकांच्या आर्थिक उन्नतीसाठी पशुसंवर्धन विभागाची सविस्तर आढावा बैठक पशुसंवर्धन, पर्यावरण मंत्री

◀◀ पान २ वर

## बीड नगरपालिकेचा स्वच्छता निरीक्षक निलंबित तर गणेश पगारे वर शिस्तभंगाचा प्रस्ताव

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील 'नवी भाजी मंडई' परिसरात अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान एका वृद्ध महिला भाजी विक्रेतीला अमानुष वागणूक दिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेची गंभीर दखल घेत बीड नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांनी मोठी कारवाई केली आहे. नगर परिषदेचे अतिक्रमण पथक प्रमुख श्री. मुनेश गायकवाड यांना तात्काळ सेवेतून निलंबित करण्यात आले असून, स्वच्छता विभाग प्रमुख

◀◀ पान २ वर

## शेतकऱ्यांच्या पेरण्याचे दिवस आहे जरांगे पाटील यांनी उपोषण करू नये-आ.प्रसाद लाड



अंबड । प्रतिनिधी

राज्यामध्ये डिझेल पेट्रोल गॅस टंचाई सुरू असून तसेच आता शेतकऱ्यांचे पेरणीचे दिवस जवळ आले असून यामुळे जरांगे पाटील यांनी उपोषण करू नये सदरील उपोषण पुढे ढकलण्यात यावे अशी विनंती आमदार प्रसाद लाड यांनी केली आहे.

मी मराठा समाजाचा असून मी जातीसाठी माती खायला तयार आहे मनोज जरांगे दादा आमच्या समाजाची हिरो आहेत मनोज जरांगे यांच्या मागण्या वास्तविक आहे मी इथून जाऊन उपसमितीशी चर्चा करून तिथं मार्ग नाही निघाला तर उपमुख्यमंत्री मुख्यमंत्री ची चर्चा करून मार्ग काढणार ३० तारीख हे शेतकऱ्याच्या पेरणीची वेळ असून पाटील यांनी उपोषण पुढे ढकलावे अशी आमदार प्रशाद लाड यांनी केली विनंती केली. मी उपोषण थांबत नसतो. मी प्रसाद लाड यांच्या

◀◀ पान २ वर

## आई-वडील आयएएस असतील, तर आरक्षण कशाला ?

### ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयाची मोठी टिप्पणी

दिल्ली । वृत्तसंस्था

**ओबीसी आरक्षणातील क्रीमी लेयर संदर्भात शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आहे. सुनावणीदरम्यान न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला की, जर एखाद्या विद्यार्थ्याचे आई–वडील दोघेही आयएएस अधिकारी असतील, तर त्यांच्या मुलांना आरक्षणाचा लाभ का मिळावा? न्यायालयाने म्हटले की, ज्या कुटुंबांनी शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या प्रगती केली आहे, त्यांच्या मुलांनी आरक्षणाच्या कक्षेबाहेर यायला हवे.**

ओबीसीमधील अधिकारी असतील, तर त्यांना अजूनही आरक्षणाचा लाभ का मिळावा? शिक्षण आणि आर्थिक सक्षमीकरणामुळे सामाजिक प्रगती होते. त्यामुळे एका विशिष्ट स्तरावर पोहोचल्यानंतरही आरक्षणाची मागणी सुरू राहिली, तर त्यावर गांभीर्याने विचार करावा लागेल.




सुनावणीदरम्यान न्यायालयाने असेही नमूद केले की, जर विद्यार्थ्यांचे पालक चांगल्या सरकारी किंवा उच्च पदांवर कार्यरत असतील आणि त्यांचे उत्पन्नही चांगले असेल, तर त्यांच्या मुलांनी आरक्षणाच्या बाहेर यायला हवे. या मुद्द्यावर सखोल चर्चा आणि पुनर्विचार होण्याची गरज असल्याचे न्यायालयाने म्हटले. न्यायमूर्ती नागरत्ना यांनी ईडब्ल्यूएस आणि ओबीसी क्रीमी लेयर यामध्ये स्पष्ट फरक असायला हवा, असे मत व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, इडब्ल्यूमध्ये सामाजिक मागासलेपण नसते, तर फक्त आर्थिक दुर्बलता असते. त्यामुळे ओबीसी क्रीमी लेयरसाठीचे निकष ईडब्ल्यूएस पेक्षा

◀◀ पान २ वर

## १ रुपयावा भाव:शेतकऱ्याने गवार रस्त्यावर फेकली

धुळे । प्रतिनिधी

आधी अवकाळी पावसाचा तडाखा आणि आता शेतमाल भाव घसरणीने शेतकरी अक्षरक्ष कोलमडून गेला आहे. धुळ्यातील साक्री तालुक्यातून शेतकऱ्यांची विदारक परिस्थिती समोर आली आहे. येथे गवारला केवळ प्रति किलो १ रुपये भाव मिळाला. यामुळे संतप्त शेतकऱ्याने गवार रस्त्यावर ओतून निषेध व्यक्त केला. शेतमाल मातीमोल झाल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे. गेल्या महिनाभरापूर्वीच अवकाळी पावसाचा फटका कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसला होता. हे तेच कांदा उत्पादक शेतकरी आहेत, ज्यांनी खराब झालेला कांदा नांगरून, रोटाव्हेटर मारुन गवार पीक घेतले. एवढ्या उन्हातान्हात कष्ट केल्यानंतर गवार पीक विकून तेल–मीठाचा प्रश्न सुटेल, अशी आशा शेतकऱ्यांना होती. पण गवारला केवळ १ रुपये भाव मिळाला. या थट्टेला शासन जबाबदार असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## थोडक्यात...

### एव्हरेस्ट गाठून विक्रम; मात्र उतरताना अपघाती मृत्यू

नवी दिल्लीः जगातील सर्वोच्च शिखर माउंट एव्हरेस्टवरून एक अत्यंत धक्कादायक आणि मन हेलावून टाकणारी बातमी समोर आली आहे. एव्हरेस्टवर यशस्वी चढाई करून इतिहास रचणाऱ्या दोन भारतीय गिर्यारोहकांचा खाली उतरताना मृत्यू झाला आहे. या दोन भारतीयांपैकी एका गिर्यारोहकाने अवघ्या दोन दिवसांपूर्वीच एकाच दिवशी सर्वाधिक लोकांनी एव्हरेस्ट सर करण्याच्या जागतिक विक्रमात आपला सहभाग नोंदवला होता. नेपाळच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी या दु:खद घटनेची पुष्टी केली असून, या घटनेमुळे गिर्यारोहण क्षेत्रात मोठी शोककळा पसरली आहे. नेपाळच्या बाजूने बुधवारी ३ भारतीयांसह तब्बल २७४ गिर्यारोहकांनी एकाच दिवशी माउंट एव्हरेस्टवर यशस्वी चढाई केली होती. एकाच दिवसात एवढ्या मोठया संख्येने लोकांनी शिखर गाठण्याची ही पहिलीच वेळ होती आणि हा एक नवा जागतिक विक्रम ठरला होता. मात्र, हा आनंद फार काळ टिकू शकला नाही. मृत पावलेल्या भारतीय पर्वतारोह्यांची ओळख अरुण कुमार तिवारी आणि संदीप अरे अशी झाली आहे.

### कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर

मुंबईः कृत्रिम बुद्धिमत्ता हे भविष्यातील परिवर्तनाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात एआय स्वीकारण्याची आवश्यकता आहे. मुंबई टेक वीकसारख्या उपक्रमांमुळे एआय मधील संधी युवकांपर्यंत पोहोचतील आणि महाराष्ट्र देशातील एआय नवोन्मेषाचे अग्रगण्य केंद्र बनेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी मुंबई टेक वीक २०२६ ची घोषणा सह्याद्री अतिथिगृहात केली त्यावेळी ते बोलत होते. टेक एंटरप्रेन्योर्स असोसिएशन ऑफ मुंबई तर्फे महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने, आयडीएफसी बँक आणि मेटा यांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित हा कार्यक्रम दि २९ आणि ३० मे रोजी जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे होणार आहे.

### सहा.बीडीओ, उपलेखापाल परिक्षा २५ मे पासून

मुंबईः महाराष्ट्र विकास सेवा अंतर्गत सहाय्यक गट विकास अधिकारी (गट–ब) या पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तींना संबंधित पदावर कायम करण्यासाठी, तसेच जिल्हा परिषद सेवेतील उपलेखापाल पदावरील पदोन्नती व नामनिर्देशनासाठीच्या विभागीय परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे. कोकण विभागाच्या अप्पर आयुक्त कार्यालय (आस्थापना) यांच्या वतीने ही माहिती देण्यात आली आहे. या परीक्षा दि. २५, २६ आणि २७ मे २०२६ रोजी पार पडणार असून, यासाठी नवीन पनवेल येथील एका प्रमुख परीक्षा केंद्राची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र विकास सेवा सहाय्यक गट विकास अधिकारी (गट–ब) या पदावरील उमेदवारांच्या स्थिरीकरणासाठीची परीक्षा दि. २५, २६ आणि २७ मे २०२६ या तीन दिवसांच्या कालावधीत घेतली जाईल. याच सोबतीने जिल्हा परिषद सेवेतील उपलेखापाल पदावर पदोन्नती मिळवण्यासाठी आणि नामनिर्देशनाव्दारे थेट नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठीची विहित परीक्षा दि. २५, २६ आणि २७ मे २०२६ या दोन दिवसांत घेतली जाणार आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहूः १७८.५० क्विंटल | १,९५१ | २,५७० | २,३३६ |
| ज्वारी/हायब्रिड: २१९.०० क्विंटल | १,९८० | ३,९५० | २,६२३ |
| मका/लोकलः ४.०० क्विंटल | १,८०० | १,८०० | १,८०० |
| तूर : २.५० क्विंटल | ७,२५० | ७,२५० | ७,२५० |
| उडीद : ३.५० क्विंटल | ५,५०१ | ६,१०० | ५,८६७ |
| बाजरीः १३८.०० क्विंटल | १,७६८ | २,८३१ | २,२६० |
| मुगः ०.५० क्विंटल | ७,६५० | ७,६५० | ७,६५० |
| सोयाबीनः २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभराः ५४.५० क्विंटल | ५,४०० | ५,७०० | ५,६०४ |

cmyk

अग्रलेख

# भ्रष्टाचाराच्या दलदलीत अडकलेली व्यवस्था

देशातील सरकारी कर्मचारी आणि अधिकारी हे शासन व्यवस्थेचे कणा मानले जातात. शासनाच्या योजना राबविणे, नागरिकांना सेवा पुरविणे, कायदे आणि नियमांची अंमलबजावणी करणे, विकासकामे पूर्ण करणे, जनतेच्या करातून जमा झालेल्या पैशांचा योग्य वापर करणे, ही अत्यंत जबाबदारीची कामे त्यांच्या खांद्यावर असतात. त्यामुळेच सरकार त्यांना चांगले वेतन, महागाई भत्ता, निवास, वाहन, वैद्यकीय सुविधा, निवृत्ती वेतन यांसारख्या अनेक सवलती देते. सातव्या वेतन आयोगानंतर तर सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन मोठ्या प्रमाणात वाढले. अनेकांच्या हातात महिन्याला लाखोंचे वेतन जाऊ लागले. तरीही काही अधिकाऱ्यांच्या अमर्याद लोभाला अंत दिसत नाही, हीच देशासमोरील सर्वांत गंभीर समस्या बनली आहे.

खरं तर सरकारी नोकरी ही आजही देशातील सर्वांत सुरक्षित आणि प्रतिष्ठेची नोकरी मानली जाते. खाजगी क्षेत्रात नोकरीची हमी नसते, बाजारातील चढ-उतारांचा परिणाम थेट कर्मचाऱ्यांवर होतो, अनेकांना निवृत्ती वेतनही मिळत नाही. परंतु सरकारी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तसे नसते. त्यांना नियमित वेतन, बढती, निवृत्ती वेतन, वैद्यकीय सुविधा यामुळे आयुष्यभर आर्थिक सुरक्षितता मिळते. एखाद्या घरात सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी असणे म्हणजे त्या कुटुंबाच्या आर्थिक स्थैर्याची मोठी हमी मानली जाते. अशा परिस्थितीत देखील काही अधिकारी भ्रष्टाचाराचा मार्ग का स्वीकारतात? हा प्रश्न सामान्य नागरिकांना अस्वस्थ करणारा आहे.

ओडिशातील कार्यकारी अभियंता भुबनेश्वर साबर यांचे प्रकरण हे या विकृत मानसिकतेचे ज्वलंत उदाहरण आहे. १९९९ मध्ये अवघ्या सहा हजार रुपयांच्या वेतनावर सरकारी सेवेत दाखल झालेला हा अधिकारी काही वर्षांतच कोट्यवधींच्या मालमत्तेचा मालक बनतो, ही बाब सामान्य माणसाला धक्का देणारी आहे. दक्षता विभागाने टाकलेल्या छाप्यांमध्ये त्याच्याकडे पाच इमारती, त्यातील चार बहुमजली, ८३ एकर जमीन, ९७ भूखंड, फार्म हाऊस, व्यापारी प्रकल्प, गाड्या, कायम ठेवी आणि इतर प्रचंड मालमत्ता असल्याचे उघड झाले. हा पैसा केवळ सरकारी वेतनातून जमा होऊ शकतो का? हा प्रश्न विचारण्याइतकी बुद्धी देशातील जनतेकडे निश्चितच आहे.

अशा प्रकारची प्रकरणे केवळ ओडिशापुरती मर्यादित नाहीत. महाराष्ट्रापासून बिहारपर्यंत, दिल्लीपासून तामिळनाडूपर्यंत प्रत्येक राज्यात अशा अधिकाऱ्यांच्या बातम्या अधूनमधून समोर येतात. कुठे तहसील कार्यालयात लाच घेताना अधिकारी पकडले जातात, कुठे सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंते कोट्यवधींच्या संपत्तीचे मालक ठरतात, तर कुठे महसूल, पोलीस किंवा महानगरपालिका विभागातील कर्मचाऱ्यांकडे बेहिशेबी मालमत्ता सापडते. भ्रष्टाचाराची ही साखळी इतकी खोलवर रुजली आहे की अनेक सरकारी कार्यालयांमध्ये 'काम करायचे असेल तर पैसे द्यावेच लागतील' ही मानसिकता सामान्य नागरिकांच्या मनात पक्की झाली आहे.

आज परिस्थिती अशी झाली आहे की सरकारी कार्यालयात एखादी फाईल हलवण्यासाठी देखील ''वजन'' ठेवावे लागते, अशी उघड चर्चा नागरिकांमध्ये केली जाते. जन्मदाखला असो, जमिनीची नोंद असो, बांधकाम परवाना असो, शासकीय अनुदान असो किंवा निविदा प्रक्रिया असो, अनेक ठिकाणी भ्रष्टाचाराची साखळी निर्माण झालेली दिसते. ही केवळ आर्थिक लूट नाही, तर लोकशाही व्यवस्थेवरील विश्वासघात आहे. कारण सरकारी अधिकारी हे जनतेचे सेवक असतात, मालक नाहीत. नागरिकांच्या करातून त्यांना वेतन दिले जाते. त्यामुळे जनतेला प्रामाणिक सेवा मिळणे हा त्यांचा अधिकार आहे.

भ्रष्टाचाराचे मूळ केवळ लोभात नाही, तर राजकीय संरक्षणात देखील आहे. अनेक वेळा प्रामाणिक अधिकारी दबावाखाली काम करतात. काही राजकीय नेते स्वतःच्या फायद्यासाठी अधिकाऱ्यांना भ्रष्टाचाराच्या मार्गावर ढकलतात. बदल्या, बढत्या, कंत्राटे, मंजुरी यामध्ये राजकीय हस्तक्षेप होत असल्याने भ्रष्टाचाराला खतपाणी मिळते. त्यामुळे केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर कारवाई करून उपयोग नाही; भ्रष्टाचाराला संरक्षण देणाऱ्या राजकीय व्यवस्थेलाही जबाबदार धरावे लागेल.

याच ठिकाणी एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेतला पाहिजे. देशातील सर्व सरकारी कर्मचारी भ्रष्ट नाहीत. आजही अनेक अधिकारी आणि कर्मचारी अत्यंत प्रामाणिकपणे काम करतात. दुर्गम भागात कमी साधनांमध्ये सेवा देणारे शिक्षक, जीव धोक्यात घालून काम करणारे पोलीस, रुग्णसेवा करणारे डॉक्टर, शेतकऱ्यांसाठी काम करणारे कृषी अधिकारी, नैसर्गिक आपत्तीमध्ये दिवस-रात्र काम करणारे कर्मचारी अशी असंख्य उदाहरणे देशात आहेत. त्यांच्या प्रामाणिकपणामुळेच व्यवस्था अजून टिकून आहे. मात्र काही भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे संपूर्ण सरकारी यंत्रणेची प्रतिमा मलिन होते आणि समाज माध्यमांवर सर्वच कर्मचाऱ्यांविरोधात संताप व्यक्त केला जातो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर देश भ्रष्टाचारमुक्त करण्याचे आश्वासन दिले होते. डिजिटल व्यवहार, थेट लाभ हस्तांतरण, ऑनलाइन सेवा, ई-टेंडरिंग यांसारख्या अनेक उपाययोजना करण्यात आल्या. काही प्रमाणात पारदर्शकता वाढली, हेही खरे आहे. मात्र भ्रष्टाचार पूर्णपणे संपला का? या प्रश्नाचे उत्तर अजूनही नकारार्थीच आहे. कारण भ्रष्टाचाराची मुळे केवळ प्रणालीमध्ये नाहीत, तर मानसिकतेमध्ये आहेत. जोपर्यंत ''सरकारी पद म्हणजे पैसे कमविण्याचे साधन'' ही मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत केवळ घोषणा करून भ्रष्टाचार थांबणार नाही.

भ्रष्टाचार रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची गरज आहे. बेहिशेबी मालमत्ता सापडल्यास ती तात्काळ जप्त झाली पाहिजे. दोषी अधिकाऱ्यांना केवळ निलंबित न करता कायमची बडतर्फी झाली पाहिजे. न्यायालयीन प्रक्रिया जलदगतीने पूर्ण झाली पाहिजे. तसेच प्रामाणिक अधिकाऱ्यांचे संरक्षण आणि सन्मान देखील तितकाच महत्त्वाचा आहे. भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई आणि प्रामाणिक अधिकाऱ्यांना प्रोत्साहन, या दोन्ही गोष्टी एकत्रितपणे घडल्या तरच व्यवस्था सुधारू शकते. ओडिशातील प्रकरणाने पुन्हा एकदा देशासमोर सरकारी भ्रष्टाचाराचे विदारक वास्तव उघडे केले आहे. ही केवळ एका अधिकाऱ्याची गोष्ट नाही; तर ही व्यवस्थेतील खोलवर रुजलेल्या रोगाची लक्षणे आहेत. आता सरकार, दक्षता यंत्रणा आणि समाज या तिन्ही घटकांनी मिळून भ्रष्टाचाराविरोधात कठोर भूमिका घेण्याची वेळ आली आहे. अन्यथा सामान्य माणसाचा शासन व्यवस्थेवरील विश्वास दिवसेंदिवस ढासळत जाईल आणि लोकशाहीची खरी ताकदच कमकुवत होईल.

# महानगरपालिकेत हाणामारी झाल्याप्रकरणी पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधु यांना निवेदन

जालना । प्रतिनिधी

**महानगरपालिकेत ठराव घेण्याच्या कारणावरून नगरसेवक महावीर ढक्का यांच्यासह ७ ते ८ जणांनी महानगरपालिका धुमाकूळ घातला तसेच नगरसेवकाला जीवे मारण्याची धमकी दिली या प्रकरणी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून परंतु नियमाप्रमाणे चौकशी होत नसल्यामुळे पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधु यांना निवेदन देण्यात आले.**



जालना महानगरपालिका कार्यालयातील मा. महापौर यांच्या दालनात दिनांक ११ मे २०२६ रोजी दोन नगरसेवकांमध्ये झालेल्या गंभीर मारहाण व हाणामारीच्या घटनेबाबत जालना जिल्ह्याचे खासदार यांनी पोलीस अधीक्षक, यांना निवेदन देऊन कठोर व निष्पक्ष कारवाईची मागणी केली आहे. सदर घटनेत लोखंडी रॉड, खंजीर यांसारख्या घातक शस्त्रांचा वापर झाल्याची माहिती समोर येत असून, सार्वजनिक व शासकीय कार्यालयात अशा प्रकारचा हिंसाचार घडणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे खासदार डॉ. काळे यांनी म्हटले आहे. या घटनेमुळे महानगरपालिका परिसरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर प्रकरणात संबंधित पक्षांकडून परस्परांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून, भारतीय न्याय संहितेअंतर्गत जिवे मारण्याचा प्रयत्न, घातक शस्त्रांचा वापर, गंभीर दुखापत करणे तसेच सार्वजनिक कार्यालयातील शांतता भंग करणे यांसारखी गंभीर कलमे लावण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, घटना घडून जवळपास १२ दिवस उलटूनही आरोपींवर प्रभावी कारवाई झालेली नसल्याबद्दल खासदार डॉ. काळे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच, या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये तडजोडीच्या माध्यमातून प्रकरण मागे घेण्याचे प्रयत्न होत असल्याची माहिती समोर येत असून, अशा प्रकरणांमध्ये न्यायालयीन प्रक्रिया व पोलीस तपास यांना बाधा पोहोचणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. खासदार डॉ. कल्याण काळे यांनी पोलीस प्रशासनाकडे खालील मागण्या केल्या आहेत : सर्व आरोपींवर निष्पक्ष, पारदर्शक व तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तपास वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली करण्यात यावा. घातक शस्त्रांचा वापर व सार्वजनिक कार्यालयातील हिंसाचाराची सखोल चौकशी करण्यात यावी. कोणत्याही दबावाखाली तपास प्रक्रियेत हस्तक्षेप होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी महानगरपालिका परिसरात आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात याव्यात. लोकशाही व्यवस्थेतील सार्वजनिक संस्थांमध्ये अशा प्रकारे हिंसाचार होणे अत्यंत दुर्दैवी असून, कायद्याचा धाक कायम राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने तात्काळ व कठोर कार्यवाही करावी, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली आहे. सदरील निवेदन देण्याचा वेळी महानगर जिल्हाध्यक्ष डॉ.विशाल धानुरे, रघुवीर गुडे, दिनेश सुराणा, शमशोद्दीन शेख, बाबासाहेब सोनवणे, नारायण वाडेकर, सुरज येलगंटीवार, वसीम कादिर, अंकुश शिंदे, भारत लोढा, इतर मान्यवर उपस्थित होते.

# जालना जिल्हा घरगणना मोहिमेत राज्यात अव्वल;१४.५९ टक्के प्रगती

जालना । प्रतिनिधी



**जनगणना २०२७ अंतर्गत सुरू असलेल्या घरगणना कार्यक्रमात जालना जिल्ह्याने महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या या मोहिमेत जालना जिल्ह्याने राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सर्वाधिक प्रगती साधली आहे.**

राज्यस्तरीय आढाव्यानुसार, जालना जिल्ह्यातील एकूण २८६३ पैकी २७०८ चे काम पूर्ण झाले असून, जिल्ह्याने तब्बल ९४.५९ टक्के प्रगती साधली आहे. ही प्रगती राज्यातील सर्वाधिक असून, जिल्हा प्रशासनाच्या नियोजनबद्ध कार्यपद्धतीची आणि कर्मचाऱ्यांच्या समन्वयाची ही मोठी पावती मानली जात आहे. जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा जनगणना कक्ष, पर्यवेक्षक, प्रगणक अधिकारी आणि संबंधित कर्मचाऱ्यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा करत ही कामगिरी साध्य केली आहे. प्रशासनाच्या काटेकोर नियोजनामुळे आणि कर्मचाऱ्यांच्या मेहनतीमुळे घरगणना मोहिमेला वेग मिळाला असल्याचे स्पष्ट होत आहे. या यशाबद्दल जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले असून, उर्वरित कामही निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, जनगणना-२०२७ ही देशाच्या नियोजन प्रक्रियेसाठी अत्यंत महत्त्वाची मोहीम असल्याने नागरिकांनीही प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# विहिरीत आडवे बोअर घेतांना क्रेन पडल्याने एका कामगाराचा मृत्यू तर तीन कामगार गंभीर जखमी

माजलगाव । प्रतिनिधी






तालुक्यातील पवारवाडी येथील एन.एस.एल युनिट -३ जयमहेश कारखान्याच्या खरात आडगाव परिसरातील विहिरीमध्ये आडवे बोअर घेण्याचे काम सुरू असताना क्रेन अचानक खाली पडल्याने गंभीर दुर्घटना घडली.या अपघातात बोअरवेल घेणाऱ्या गाडीतील एका कामगाराचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे, तर तीन कामगार गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून,अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. वाहन मालकाच्या निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना घडल्याची प्राथमिक शक्यता व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा सुरू केला असून पुढील तपास सुरू आहे.

# माजलगावात युवकावर जीवघेणा हल्ला ; गुंडांच्या दहशतीने नागरिकही भयभीत

माजलगाव । प्रतिनिधी

**शहरात वाढत्या गुंडगिरीने पुन्हा एकदा थैमान घातले असून दिनांक २२ मे रोजी सायंकाळी पाच ते सहा वाजण्याच्या दरम्यान हॉटेल जय वीरू समोर एका युवकावर जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. भररस्त्यात काही गुंडांनी युवकाला घेरून लोखंडी रॉड, काठ्या व धारदार शस्त्रांनी बेदम मारहाण करत गंभीर जखमी केले.**



विशेष म्हणजे, हा प्रकार घडत असताना परिसरात अनेक नागरिक उपस्थित होते. मात्र गुंडांच्या दहशतीमुळे कोणालाही सोडवणूक करण्याचे धाडस झाले नाही. हल्लेखोरांनी अक्षरशः परिसरात दहशत निर्माण केली होती. गुंड घटनास्थळावरून पसार झाल्यानंतर गावातील चार-दोन युवकांनी जखमी युवकाला तातडीने रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात डॉक्टरांनी युवकाच्या गंभीर दुखापती पाहून प्राथमिक उपचार करून त्याला पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालय बीड येथे रेफर केले. युवकाची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेनंतर माजलगाव शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. खुलेआम फिरणारे गुंड, वाढती दादागिरी आणि नागरिकांमध्ये निर्माण झालेली भीती यामुळे पोलिस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. ''गुन्हेगारांना पोलिसांचा धाक उरलेला नाही का?'' असा संतप्त सवाल आता नागरिकांतून व्यक्त केला जात आहे. पोलीस निरीक्षक सूर्यतळ साहेब यांच्या कार्यकाळात अशा प्रकारच्या घटनांमुळे प्रशासनाच्या प्रतिमेलाही धक्का बसत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. ''वेळीच या गुंडांवर कठोर कारवाई झाली नाही तर माजलगावचे वातावरण बिघडून शहर गुन्हेगारीच्या विळख्यात अडकायला वेळ लागणार नाही,'' अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी तसेच शहरातील सक्रिय गुंड टोळ्यांवर विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

## पान १ वरून...

### डिझेलसाठी सातबारा

तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ''शेतकरी असल्याचा पुरावा मागणे ही अपमानास्पद बाब आहे. शेतीची कामे सुरू असताना आम्हाला रांगेत उभे राहावे लागत आहे,'' अशी भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली. दरम्यान, या संपूर्ण प्रकाराची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले असून, शेतकऱ्यांकडे सातबारा मागणाऱ्या पेट्रोल पंपांवर कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. याबाबत बोलताना भरणे म्हणाले की, ''शेतकऱ्यांकडे डिझेलसाठी सातबारा मागणे हा चुकीचा प्रकार आहे. या संदर्भात मी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा केली असून चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. राज्यात कुठेही पेट्रोल किंवा डिझेलची टंचाई नाही. काही जणांकडून विनाकारण अफवा पसरवल्या जात आहेत.''ते पुढे म्हणाले की, ''अफवांमुळे नागरिक आणि शेतकरी घाबरून मोठ्या प्रमाणावर डिझेल खरेदी करत आहेत. त्यामुळे इंधनाचा खप जवळपास २० टक्क्यांनी वाढला आहे. अनेकजण साठेबाजीच्या भीतीने अतिरिक्त डिझेल घेण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र राज्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाबरण्याचे कारण नाही.'' खरीप हंगामातील मशागतीची कामे सुरू असल्याने ट्रॅक्टर, पंपसेट आणि शेतीच्या इतर यंत्रांसाठी डिझेलची मोठी गरज भासत आहे. अशात काही पेट्रोल पंपांवर 'साठा संपला' असे फलक लावण्यात आले असून, त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता अधिक वाढली आहे. अनेक गावांमधून शेतकरी पहाटेपासूनच पंपांवर रांगा लावत असल्याचे दिसून येत आहे. मुख्यमंत्र्यांनीही राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा असल्याचे स्पष्ट केल्याचे सांगत कृषिमंत्र्यांनी अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले. ''शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र डिझेल राखीव ठेवण्याची गरज नाही. प्रत्येकाला आवश्यक तेवढे इंधन मिळेल. त्यामुळे पंपांवर अनावश्यक गर्दी करू नये,'' असे त्यांनी म्हटले. दरम्यान, खतांच्या 'लिंकिंग' प्रकारावरही कृषिमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली. ''दुकानदारांनी केवळ अनुदानित खते विक्रीसाठी ठेवावीत. विनाअनुदानित कृषी निविष्ठा घेण्याची सक्ती करू नये. अन्यथा खतांच्या लिंकिंगच्या तक्रारी वाढतात,'' असे त्यांनी स्पष्ट केले. डिझेलसाठी सातबारा मागण्याच्या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाने तातडीने परिस्थिती नियंत्रणात आणण्याची मागणी होत आहे.

-----------

### पेट्रोल-डिझेलचा पुरेसा

उपलब्ध करून देण्यास सक्षम आहेत. त्यामुळे अफवा किंवा भीतीच्या वातावरणामुळे अतिरिक्त साठा करण्याची आवश्यकता नाही,'' असे आवाहन केले. शेवटी बोलताना छगन भुजबळ यांनी यावेळी राज्यातील विविध जिल्ह्यांमधील गेल्या काही दिवसांतील इंधन विक्रीची आकडेवारीही माध्यमांसमोर मांडली. नागरिकांनी संयम बाळगून आवश्यकतेनुसारच इंधन खरेदी करावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन देखील यावेळी केले.

------------

### गो-तस्करांना आता थेट

४८ चा संदर्भ दिला आहे, जे गायी, वासरे आणि इतर दुधाळ व कष्टाची कामे करणाऱ्या गुरांच्या जातींचे संवर्धन व त्यांच्या कत्तलीवर बंदी घालण्याची जबाबदारी राज्यावर टाकते. यानुसार 'महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६' आणि 'प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक अधिनियम, १९६०' ची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्याच्या सीमांवरून होणारी गुरांची तस्करी रोखण्यासाठी सीमावर्ती जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना शेजारील राज्यांतून महाराष्ट्रात येणाऱ्या प्रमुख मार्गांवर संयुक्त तपासणी नाके उभारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या नाक्यांवर पोलीस, परिवहन विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी २४ तास तैनात असतील. तसेच, अनधिकृत कत्तलखान्यांवर अचानक छापे टाकण्यासाठी संयुक्त भरारी पथके तैनात केली जातील. परिवहन विभागाला बेकायदेशीर वाहतूक करणारी वाहने जप्त करून कडक दंड आकारण्याच्या सूचना दिल्या आहेत.

---------------

### बीड नगरपालिकेचा स्वच्छता

श्री. गणेश पगार यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी वरिष्ठ पातळीवर प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. या धडक कारवाईमुळे पालिकेच्या वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. २१ मे २०२६ रोजी बीड शहरातील नवी भाजी मंडई भागात नगर परिषदेच्या वतीने अतिक्रमण हटवण्याची मोहीम सुरू होती. या मोहिमेदरम्यान अतिक्रमण विभागाचे प्रमुख मुनेश गायकवाड आणि स्वच्छता विभागाचे प्रमुख गणेश पगार यांनी तेथे भाजी विक्री करणाऱ्या एका वृद्ध महिलेसोबत अत्यंत अमानुष आणि गैरवर्तणूक केली. या अधिकाऱ्यांनी वृद्ध महिलेची भाजी तर फेकून दिलीच, शिवाय तिचा जेवणाचा डबाही बळजबरीने हिसकावून घेऊन ट्रॅक्टरमध्ये फेकून दिला.सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल, सर्वत्र संतापया अमानुष कारवाईचा व्हिडिओ समाज माध्यमांवर (सोशल मीडिया) प्रचंड व्हायरल झाला. व्हिडिओ समोर आल्यानंतर नागरिकांमधून या क्रूर वर्तणुकीबद्दल तीव्र संताप व्यक्त केला जात होता. तसेच याप्रकरणी प्रशासनाकडे ई-मेलद्वारे रीतसर तक्रारही नोंदवण्यात आली होती.

-----------

### ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करण्यासाठी

पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडली. यावेळी पशुसंवर्धन सचिव रामास्वामी एन., पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत पशुसंवर्धनाला कृषी दर्जा मिळाल्यानंतरच्या पुढील कार्यवाहीसह, नवीन योजनांची अंमलबजावणी व विभागातील रिक्त पदांच्या भरतीबाबत अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून, संबंधित अधिकाऱ्यांना गतिमान कामाचे निर्देश देण्यात आले आहेत. पशुसंवर्धन क्षेत्राला नुकताच कृषी क्षेत्राचा दर्जा बहाल करण्यात आला आहे. या ऐतिहासिक निर्णयानंतर पशुपालकांना व शेतकऱ्यांना कृषी क्षेत्राप्रमाणेच विविध सवलती, कर्ज आणि योजनांचा लाभ मिळणे सुलभ झाले आहे. या निर्णयाची तळागाळातील पशुपालकांपर्यंत प्रभावी अंमलबजावणी कशी करता येईल, तसेच तांत्रिक व प्रशासकीय अडचणी कशा दूर करता येतील, याचा सखोल आढावा घेऊन तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले. यामुळे ग्रामीण भागात दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालनाला मोठी चालना मिळणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय दवाखान्यांचे बळकटीकरण, फिरते पशुवैद्यकीय दवाखाने व जनावरांच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास करणे यावर भर देण्यात यावे. शासनाच्या नवीन योजनांची अंमलबजावणी थेट लाभार्थ्यांपर्यंत विनाविलंब पोहोचवण्यासाठी यंत्रणेने अधिक तत्परतेने काम करावे, अशा सूचना श्रीमती मुंडे यांनी दिल्या.

**रिक्त पदांची तातडीने भरती होणार...**

पशुसंवर्धन विभागाचा कारभार अधिक कार्यक्षमतेने चालवण्यासाठी व पशुपालकांना वेळेत सेवा मिळण्यासाठी विभागातील विविध संवर्गातील रिक्त पदांचा आढावा घेऊन भरती प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देश श्रीमती मुंडे यांनी दिले. यामुळे सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील व ग्रामीण स्तरावर पशुवैद्यकीय सेवांचा दर्जा सुधारेल. ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी द्यायची असेल तर पशुपालन क्षेत्राचा विकास करणे अत्यंत गरजेचे आहे. कृषी दर्जा मिळाल्यामुळे या क्षेत्राला नवे बळ मिळाले असून, सर्व योजनांची अंमलबजावणी पारदर्शक व वेगवान पद्धतीने करण्याचे निर्देश पंकजाताई मुंडे यांनी अधिकाऱ्यांना दिले.

---------

### शेतकऱ्यांच्या पेरण्याचे दिवस आहे जरांगे

मानावर मान टाकली आहे म्हणून महाराष्ट्र मधील समाजाच्या बैठक थांबवल्या आहे सरकारची २८ तारखे पर्यंत निर्णयाची वाट बघणार आहे सरकारने आमच्या मागणी मान्य न केल्यास मात्र ३० तारखेला मी उपोषणास बसणार आहे माझ्या माय बाप समाजासाठी माझा जीव गेला तरी चालेले. मात्र प्रसाद लाड यांच्यावर विश्वास ठेवून महाराष्ट्रभरातील समाजाच्या बैठका थाबलवली आहे त्या मुळे उपोषण स्थळी जास्तीचे लोक येणार नाही. समाजाने येऊ नये मात्र सरकारने काही गनिमी कावा करण्याचा प्रयत्न केला तर समाजाला हाक दिली तर उपोषण स्थळी यावे कारण सरकारला गर्दी महत्त्वाचे असते. लाड.तुम्ही मला दाखवण्यासाठी आणलेले कागदपत्रे फक्त शेंगा हाण्यासाठी आणले आहे. हे मला चागलं समजत. प्रसाद लाड म्हणजे मुख्यमंत्री आहे तुम्ही आल्या पासून उद्या कळेल आम्हाला. आमच्या मागण्या पूर्ण होतात की नाही मी उपोषणास बसलेलो होतो म्हणून माझ्याकडून काही शब्ध गेले असतेन मात्र उपोषण नसताना माझ्याकडून काही चुकीच शब्ध आले का. तर मुख्यमंत्री म्हणतात. कि पोलीस माझे आहेत आम्ही तुमचे नाही का. म्हणून आमच्या कडून काही शब्द बोलले गेले असेल. कारण नसताना सरकारने आमच्यावर लाठी हल्ला केला सात वर्षाच्या मुलीच्या पिढरीतून आरपार गोळी गेले तिच्या पाय निकामी होता होता वाचला हे मुख्यमंत्री यांना दिसलं नाही का. कोणी दाखून द्यावा मी एक रु घेतला तर मी उद्या फाशी घेतो. समाजासाठी माझे मुलं कितीवीला शिकतात व माझे आई वडील कुठं राहतात हे मला माहित नाही. मी फक्त समाजासाठी काम करतो. सरकारने समाजाचे मन दुखलं गेले तर सत्ता खालीवर ह्यायाला वेळ लागणार नाही.. मी ह्या आठ महिन्यात कधी देवेंद्र फडणवीस यांना बोललो हे दाखवा. तुम्ही म्हणालात कि मुख्यमंत्री आपला जातीचा नाही तरी आरक्षण दिलं तरी ते आमच्या जातींचे नसून पण मराठा समजाने तुम्हाला निवडून दिलं ना? तुमच्या कडे पद आहे किंवा नाही हे समजून तुमच्या कडे आम्ही मागणी करतो. मंडल कमिशन ने ओबीसींना कोणत्या निकष्यावर आरक्षण दिलं ओबीसींना मागास सिद्ध केलं नाही कोणत्या आधारावर आरक्षण दिलं मात्र मराठा ओबीसी एक आहे असं असून सुद्धा तुम्ही आम्हाला आरक्षण देत नाही त्यांना कोणत्या निक्ष्यात दिलं ते सांगा.. नारायण राणे यांनी आम्हाला १६% आरक्षण दिलं त्या नंतर गायकवाड आयोगाने १३% आरक्षण दिले १६ टक्के करून १३ टक्केवारी आम्ही आलो आम्हाला मुलं ह्यचोंना का.? आम्हला येड्यात काढल जात. आहे मराठे श्रीमत आहे मराठ्याकडे साखर कारखाने सूतगिरणी आहेत तो निकष असेल त्या मुळे आरक्षण देत नसाल तर छगन भुजबळ. पंकजाताई यांचा कडे कारखाना आहे तर काढा दोन्ही जातीना सुद्धा आरक्षण बाहेर.काढा.

----------

### तत्कालीन जिल्हाधिकारी

केले आहे. या निलंबन काळामध्ये त्यांचे मुख्यालय बीड राहणार आहे. सेवानिवृत्तीच्या जवळ आलेल्या अविनाश पाठकांना हा मोठा धक्का आहे.

-------------

### आई-वडील आयएएस असतील,

वेगळे आणि अधिक व्यापक असायला हवेत. दोघांनाही समान निकषांवर मोजले, तर त्यातील फरकच संपून जाईल. न्यायालयाने पुढे म्हटले की, जेव्हा आरक्षणाचा लाभ घेऊन एखादे कुटुंब शिक्षण, नोकरी आणि सामाजिकदृष्ट्या एका स्तरावर पोहोचते, तेव्हा काही संतुलन असणे आवश्यक आहे. उदाहरण देताना न्यायालयाने म्हटले की, जर आई-वडील दोघेही सरकारी सेवेत उच्च पदावर असतील, चांगल्या आर्थिक स्थितीत असतील, तर त्यातून सामाजिक प्रगती स्पष्ट दिसते. दरम्यान, या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने नोटीस जारी केली आहे. मात्र, हा अंतिम निर्णय नसून सुनावणीदरम्यान केलेली प्राथमिक टिप्पणी असल्याने या विषयावर पुढील सुनावणीत अधिक स्पष्टता येण्याची शक्यता आहे.

-----------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार, दि. २३ मे २०२६



## थोडक्यात

### श्रेयशी कुंडकर हिचे शिष्यवृती परीक्षेत यश

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सिद्धेश्वर नगर, शिंपेटाकळी येथील रहिवाशी असलेले श्री. उद्धव कुंडकर यांची मुलगी कु .श्रेयशी कुंडकर हि श्री. सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय माजलगाव येथील विधार्थींनी आहे, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृती परीक्षा २०२६ इयत्ता ८ वी. १८८ गुणांसह उत्तीर्ण होऊन पात्र झाली आहे. ग्रामीण भागातील विधार्थी हि योग्य पद्धतीने अभ्यास केल्यावर पूर्व माध्यमिक शिष्यवृती परीक्षा पात्र होऊ शकतात हे तिने सिद्ध केले आहे .



या विदयार्थी यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, कार्यवाह, उपाध्यक्ष, शिक्षक, गावातील सर्व शिक्षण प्रेमी नागरिक यांनी तिचे अभिनंदन केले आहे. तसेच या परीक्षेसाठी तिला मोलाचे मार्गदर्शन श्री.रोकडे सर, नेमट सर यांनी केले आहे.

### समाधान महाराजांच्या शिवपुराण कथेला भाविकांची अलोट गर्दी

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात कीर्तनकार तथा शिवपुराण कथा प्रवक्ते ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या शिवमहापुराण कथेसाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. रुद्राक्ष सेवा संघ आयोजित शिवपुराण कथेच्या चौथ्या दिवशी शिव- पर्वती विवाह सोहळा कथा निरुपण करतांना भाविक तल्लीन झाले. कथा प्रवक्ते भावरत्न ह.भ.प. समाधान महाराज यांचे अत्युच्च निरुपण भाविकांना आनंद आणि समाधान देतात.अध्यात्माबरोबरच वास्तववादी जीवन जगण्याचा संदेश देतात. शिवपुराण कथेतील शिव- पार्वती विवाह सोहळा, प्रसंग, विविध प्रसंग निरूपण करतांना भाविक श्रोते तल्लीन होऊन मनमुराद आनंद घेतांना दिसतात. कथेत सहभागी होउन आनंद लुटताना दिसतात. कथा निरूपण दरम्यान साथसंगत देणाऱ्या कलावंताचा परिचय अधून, मधून करतात. गुणवंत साथीदाराची कला सादरीकरण श्रोत्यांना मनमोहित करते.



### उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक स्वराज्यसंस्था मतदारसंघ निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

बीड । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाने (उस्मानाबाद-लातूर-बीड ) स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद द्वैवार्षिक निवडणूक-२०२६ कार्यक्रमाची घोषणा केली आहे. याबाबत धाराशिव जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी किर्ती किरण पुजार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे माहिती दिली.

निवडणुकीची अधिसूचना दि. २५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत दि. १ जून २०२६ आहे. अर्जांची छानना दि. २ जून रोजी होणार असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ४ जून २०२६ निश्चित करण्यात आली आहे. मतदान दि. १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत होणार आहे. मतमोजणी सोमवार दि. २२ जून २०२६ रोजी होईल. निवडणूक प्रक्रिया दि. २५ जून २०२६ रोजी पूर्ण करण्यात येणार आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. असे उप जिल्हा निवडणूक अधिकारी, बीड यांनी कळविले आहे.

# लोकशाही सुस्त की नागरिक 'जागे'?

## देशात नव्या 'डिजिटल' आंदोलनाचा भडका !

पाटोदा । प्रतिनिधी

लोकशाही व्यवस्था आता झोपली आहे की काय? असा संतप्त सवाल आजचा तरुण वर्ग विचारत आहे. देशातील सुशिक्षित बेरोजगार, पेपर फुटीने त्रस्त असलेले विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांमध्ये व्यवस्थेबद्दल कमालीचा असंतोष पसरला आहे. या सुस्त पडलेल्या यंत्रणेला जागे करण्यासाठी आता 'त्रक्षप-न' म्हणजेच आजच्या तरुण पिढीने सोशल मीडियाच्या माध्यमातून एका अभूतपूर्व डिजिटल क्रांतीची ठिणगी टाकली आहे १.एका रात्रीत उभे राहिले सर्वात मोठे डिजिटल आंदोलनकाही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाच्या एका सुनावणी दरम्यान तरुणांच्या संदर्भाने 'कॉकरोच' (झुरळ) आणि 'परजीवी' अशा शब्दांचा वापर झाल्याचा आरोप झाला. या अपमानाचा बदला




घेण्यासाठी तरुणांनी सोशल मीडियावर थेट 'कॉकरोच जनता पार्टी' नावाचे एक उपरोधिक आंदोलन सुरू केले १. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, अवघ्या ४ ते ५ दिवसांत या डिजिटल चळवळीच्या इन्स्टाग्राम अकाउंटने १ कोटी ३० लाखांहून अधिक फॉलोअर्सचा टप्पा पार केला १. सत्ताधारी भाजपच्या १२ वर्षांच्या सत्तेनंतर असलेल्या ८७ लाख फॉलोअर्सच्या आकड्याला या तरुणांनी काही तासांत मागे टाकले १.'झुरळ' बनले स्वाभिमानाचे प्रतीकज्या तरुणांना 'झुरळ' म्हणून हिणवले गेले, त्यांनीच आता ' (मी सुद्धा झुरळ) मोहीम चालवून सत्तेला आव्हान दिले आहे १. हा केवळ एक सोशल मीडिया ट्रेंड राहिलेला नाही, तर तो सुस्त व्यवस्थेविरुद्धचा एक मोठा आक्रोश बनला आहे. जसे २०११ मध्ये अण्णा हजारे यांच्या आंदोलनाने संपूर्ण देशाला हलवून सोडले होते, तसेच हे आंदोलन आजच्या डिजिटल युगातील 'अण्णा आंदोलन' ठरत आहे १.तरुणांचा जाहीरनामा आणि मागण्या:जरी हे आंदोलन डिजिटल स्वरूपात असले, तरी त्यांच्या मागण्या अत्यंत गंभीर आणि विचार करायला लावणाऱ्या आहेत:१. नोकऱ्या आणि सुरक्षा: देशातील बेरोजगारी दूर करून पेपर फुटीवर कायमचा आळा घालावा.२. पारदर्शकता: लोकशाही संस्थांनी सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली न येता स्वतंत्रपणे काम करावे.३. उत्तरदायित्व: जनतेच्या प्रश्नांना बगल देणाऱ्या नेत्यांना आणि अधिकाऱ्यांना कडक शिक्षा व्हावी.सत्तेची धास्ती आणि दडपशाही?या आंदोलनाची धास्ती घेऊन की काय, अवघ्या काही तासांतच या चळवळीचे मुख्य '' (ट्विटर) अकाउंट भारतात ब्लॉक करण्यात आले १. परंतु, तरुणांचा उत्साह कमी झालेला नाही. तुम्ही आमचे अकाउंट बंद करू शकता, पण आमच्या मनातील प्रश्न कसे दाबणार? असा सवाल तरुण विचारत आहेत १.थोडक्यात...जर राज्य आणि लोकशाही झोपली असेल, तर तिला जागे करण्याचे काम नेहमीच तरुणांनी केले आहे. आजचा तरुण वर्ग केवळ रिल्स पाहणारा नाही, तर तो स्वतःचे हक्क मागण्यासाठी डिजिटल हत्यार उपसू शकतो, हे या आंदोलनाने सिद्ध केले आहे १. आता ही डिजिटल लाट मतपेटीपर्यंत पोहोचणार का? याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

## सामाजिक कार्यकर्त्याची मनरेगा अर्धवट कामांबाबत माहिती मागविली

### शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत लढत राहू -अतुल शेलार

पाटोदा । प्रतिनिधी

सामाजिक कार्यकर्ते अतुल शेलार यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) १ जानेवारी २०२३ ते १ एप्रिल २०२६ या कालावधीत राहिलेल्या सर्व अर्धवट कामांची यादी, जिओ ट्रॅकिंग रिपोर्ट व वितरित केलेल्या रकमेचा पूर्ण तपशील आरटीआय कायद्याच्या माध्यमातून मागितला आहे.



अतुल शेलार यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील अनेक शेतकरी कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळत नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. अनेक कामे अर्धवट राहिल्यामुळे मजुरांचे पैसे त्यांच्या खात्यावर पडत नाहीत. यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचे त्यांचे मत आहे.त्यांनी यासंदर्भात ग्रामपंचायत कुसळंब येथील ग्रामसेवकांकडे लेखी मागणी केली आहे. तसेच या अर्जाची प्रत तालुक्यातील गट विकास अधिकारी (बीडीओ) यांनाही पाठवण्यात आली आहे.कायद्याने बांधीलता आरटीआय कायद्यानुसार कोणत्याही नागरिकाला ही माहिती मागण्याचा पूर्ण अधिकार आहे. ग्रामसेवक हे ग्रामपंचायतीचे अधिकारी असल्याने, मागितलेली माहिती लवकरात लवकर उपलब्ध करून देणे हे त्यांचे कायद्याने बंधनकारक कर्तव्य आहे. कामे का रखडली, कोणत्या कारणामुळे अर्धवट राहिली, झालेला खर्च आणि जिओ ट्रॅकिंग रिपोर्ट यांचा संपूर्ण तपशील देणे आवश्यक आहे.अतुल शेलार हे बीड जिल्ह्यातील एक स्वच्छ आणि परिचित सामाजिक कार्यकर्ते आहेत. पारदर्शकता, स्वाभिमान आणि सामाजिक न्यायासाठी ते सातत्याने काम करतात.शासकीय योजनांमधील गैरव्यवहार उघडकीस आणण्यात त्यांचा सक्रिय सहभाग असतो. त्यांच्या या पुढाकाराचे गावकऱ्यांसह जिल्हाभरात कौतुक होत आहे.

शेतकरी कुटुंबांसाठी न्यायाची मागणी

मनरेगा ही ग्रामीण भागातील कुटुंबांसाठी रोजगार हमी देणारी महत्त्वाची योजना आहे. मात्र, अर्धवट कामे आणि विलंबित पेमेंटमुळे अनेक लाभार्थ्यांना अडचणी येत आहेत. अतुल शेलार यांच्या या ठढख मागणीमुळे योजनेच्या अंमलबजावणीत पारदर्शकता वाढेल आणि रखडलेल्या कामांना गती मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.शासनाने याबाबत तातडीने कार्यवाही करून मागितलेली माहिती उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी अतुल शेलार यांच्यासह स्थानिक नागरिक करत आहेत.

## पान ६ वरुन...

### आयुष्मान भारत योजनेचा

काढताना अडचणी येत असल्याचा मुद्दा बैठकीत गाजला. यावर आमदार सुरेश धस यांनी तहसीलदारांना थेट सूचना देत, एकही पात्र कुटुंब योजनेपासून वंचित राहता कामा नये. प्रशासनाने तत्काळ प्रमाणपत्रे उपलब्ध करून द्यावीत, असे स्पष्ट आदेश दिले. जामखेड व इतर भागातील काही खासगी रुग्णालयांकडून अवास्तव शुल्क आकारले जात असल्याची गंभीर बाबही बैठकीत समोर आली. यावर डॉ. शेटे यांनी, गरीबांच्या आजारावर कमाई करणाऱ्यांना सोडले जाणार नाही. बीडमधील काही रुग्णालयांवर १० लाख रुपयांपर्यंत दंड ठोठावला आहे; पुढेही कारवाई सुरूच राहील, असे ठणकावून सांगितले. आगामी महाआरोग्य शिबिरासाठी गावागावात जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असून आयुष्मान भारत योजनेचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांना मुंबई येथे विशेष प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येणार असल्याची माहितीही देण्यात आली. आष्टी तालुक्यातील वाढत्या अपघातांच्या घटना लक्षात घेता आणखी एक १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही यावेळी देण्यात आले. या बैठकीस अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संजय कदम, तहसीलदार वैशाली पाटील, नगराध्यक्ष जिया बेग, दत्ता काकडे, गणेश शिंदे, अमित घाडगे महाराज, डॉ. गायकवाड, डॉ. वसीम शेख, डॉ. राजेश तांदळे, डॉ. रामदास मोराळे, उद्धव सानप, गोकुळ बागलाने यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हॉटेल चालकाची चाकूने

घटनेची माहिती मिळताच मृताचा मोठा मुलगा ओमकेश आंधळे आणि नातेवाईक तातडीने परळी येथील अरुणोदय मार्केट लाईन परिसरातील मोकळ्या जागेत धावले. तेथे कारभारी आंधळे हे निपचित पडलेले आढळून आले. त्यानंतर नातेवाईकांनी तातडीने पोलिसांशी संपर्क साधून त्यांना अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी ओमकेश आंधळे याच्या फिर्यादीवरून परळी पोलिसांनी सचिन राठोड आणि सुमीत पवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी सचिन राठोड यास ताब्यात घेतले असून सुमित पवार फरार झाला आहे. पोलीस उपनिरिक्षक नितीन गट्टूवार पुढील तपास करत आहेत.

### परळी पंचायत समितीत

ग्रामपंचायत कार्यालयातील अनेक कामे रखडत आहेत. रहिवासी दाखला, पीटीआर नक्कल, जन्म-मृत्यू दाखले, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, हयात दाखला तसेच विविध शासकीय कागदपत्रांसाठी ग्रामस्थांना वारंवार हेलपाटे मारावे लागत आहेत. यामुळे ग्रामीण नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, अतिरिक्त कार्यभारामुळे काही ठिकाणी आर्थिक मागण्या वाढत असल्याचाही आरोप नागरिकांकडून केला जात आहे. काही दिवसांपूर्वी एका ग्रामसेवकाला एक हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले होते. संबंधित ग्रामसेवकाकडेही अतिरिक्त गावांचा कारभार असल्याची चर्चा होती.रिक्त पदे तातडीने भरून ग्रामसेवकांना मुख्यालयी राहण्याचे आदेश काटेकोरपणे लागू करावेत, अशी मागणी आता ग्रामीण भागातून जोर धरत आहे.

### महसूल प्रशासन व

महसूल विभागाने आता थेट महामार्गावरही धडक कारवाई सुरू केली आहे. साष्टपिंपळगाव येथून छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने विनापरवाना वाळू घेऊन जाणाऱ्या दोन हायवा ट्रकवर भोकरवाडी टोलनाका येथे छापा टाकून त्यांना जप्त करण्यात आले आहे. या कारवाईत तब्बल६० लाख २१ हजार ८०० रुपयेकिमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोन चालकांविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### परंपरेने नगद नारायणाची

केलेला आहे. संतांच्या दरबारात गेल्यानंतर सेवेची शिदोरी असणे महत्त्वाच आहे. मुक्त असलेला जीव मायेच्या संगतीत आल्याने बाध्य झाला. जीव माझे माझे म्हणून मायेत गुंतलेला आहे. मूळ स्वरूपाला सोडल्यानंतर जीवनात दुःख प्राप्त होते. जीव हा ब्रम्हाचा अंश आहे मात्र मायेच्या संगतीमध्ये आल्यामुळे त्याच्या वाटायला दुःख येते. हा सिद्धांत पटवून देताना महाराजांनी मिठाचे उदाहरण दिले. समुद्रामध्ये मीठ हे जलस्वरूप असते मात्र स्वरूप सोडून बाजूला आल्यानंतर मिठाच्या वाट्याला दुःख येते त्याच पद्धतीने मानवी जीवनाचेही आहे. त्यामुळे मी सुखाने कीर्तन करत आहे. हा गुण कीर्तन लीला कीर्तन स्वरूप कीर्तन असे कीर्तनाचे विविध प्रकार आहेत.किर्तन साधनेतून देवत्वाची प्राप्ती करून घेता येते. प्रत्येकाचा देव वेगवेगळा आहे ज्याची अशी भक्ती असेल तसा देव पाहायला मिळतो. मीराबाईचा देव,तुकाराम महाराजांचा,देव जनाबाईचा देव ,नामदेव महाराजांचा देव प्रत्येकाच्या देवाच्या संकल्पना वेगळे आहेत मात्र तत्त्व स्वरूपामध्ये देऊ जसा आहे. तसाच आहे.असं महाराजांनी सांगितलं. यावेळी नगद नारायण गडावरील सर्व टाळकरी मंडळी गायक, वादक मंडळी यांची उपस्थिती होती.

## साधेपणातून समाजसेवेचा आदर्श; डॉक्टर नवदांपत्याचा आष्टीत अनोखा विवाह सोहळा

आष्टी प्रतिनिधी

आष्टी येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ. राजेंद्र जरांगे यांची कन्या डॉ. ऋतुजा यांचा विवाह अहिल्यानगर जिल्ह्यातील वाळकी येथील दूध डेअरीचे चेअरमन रामदास मस्के यांचे चिरंजीव डॉ. अभिनव मस्के यांच्यासोबत अत्यंत साध्या पद्धतीने संपन्न झाला. आष्टी येथील आराज मल्टीपर्पज मंगल कार्यालयात पार पडलेल्या या विवाह सोहळ्याने सामाजिक बांधिलकीचा आदर्श समाजासमोर ठेवला.



डॉ. राजेंद्र जरांगे यांची कन्या डॉ. ऋतुजा अन् डॉ.अभिनवचां असाही विवाह सोहळा

कुठलाही मोठा गाजावाजा न करता आणि अनावश्यक खर्च टाळून हा विवाह सोहळा पार पडला. सत्कार समारंभासाठी होणारा खर्च वाचवून नवदांपत्याने तो निधी अहिल्यानगर जिल्ह्यातील घोडेगाव येथील अनाथ आश्रमातील मुलांच्या मदतीसाठी दिला. तसेच वाळकी परिसरातील जिल्हा परिषद शाळेला देखील मदत करण्याचा संकल्प नवदांपत्याने यावेळी व्यक्त केला.

समाजाने आपल्याला खूप काही दिलं आहे. त्यामुळे आपल्या आयुष्यातील आनंदाच्या क्षणी समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडणं गरजेचं आहे, अशी भावना डॉक्टर वधू-वरांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी दूरध्वनीद्वारे नववधू-वरांना शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक जाणिवेच्या निर्णयाचे कौतुक केले. या विवाह सोहळ्यास स्वराज्य जनजागृती परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अँड.अजित देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी नवदांपत्याच्या या सामाजिक उपक्रमाचे विशेष कौतुक करत, अशा पद्धतीचे विवाह समाजासाठी प्रेरणादायी आहेत, असे मत देशमुख यांनी व्यक्त केले. विवाह सोहळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक तसेच नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रेनीसनच्या डॉ शिरूरे मुळे भाशिप्र येणार अडचणीत!

बीड । प्रतिनिधी

नीट पेपरफुटी प्रकरणात रोज नवनवे खुलासे होतं आहेत. लातूरचा शिवराज मोटेगावकर आणि पी व्ही कुलकर्णी यांची अटक झाल्यानंतर डॉ मनोज शिरूरे यांनाही अटक करण्यात आली आहे. हे महाशय भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या अनधिकृत असलेल्या रेनीसन इंग्लिश स्कुलचे अध्यक्ष आहेत हे विशेष. त्यामुळे या तपासात पेपरफुटीचे धागेदोरे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेपर्यंत पोहचल्यास आश्चर्य वाटायला नको.मोटेगावकर हा काँग्रेस चा म्हणजेच आ अमित देशमुख यांचा कार्यकर्ता असल्याचे सांगत जे भाजपचे नेते टीका करत होते आता डॉ शिरूरे यांच्या अटकेनंतर तेच भाजपचे नेते आणि कार्यकर्ते कोणती भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

वैद्यकीय पात्रता परीक्षा अर्थात नीट युजी परीक्षेचा पेपर फुटल्यानंतर ही परीक्षा रद्द करण्यात आली असून २१ जून रोजी नव्याने परीक्षा घेण्यात येणार आहे दरम्यान या परीक्षेत गडबड घोटाळा करणाऱ्या नाशिक अहिल्यानगर पुणे लातूर राजस्थान हरियाणा येथील बारा ते पंधरा जणांना सीबीआयने आतापर्यंत अटक केली आहे.

या सर्व पेपर फुटी प्रकरणाचा मास्टरमाइंड हा लातूर येथील आरसीसी कोचिंग क्लासेस चा मालक शिवराज मोठेगावकर हा असल्याचे उघडके झाल्यानंतर सीबीआय ने त्याला अटक केली तसेच निवृत्त प्राध्यापक पी व्ही कुलकर्णी यांना देखील अटक केली. या दोघांच्या चौकशीत अनेक पालक आणि विद्यार्थ्यांची नावे समोर आली पाच ते दहा डॉक्टर आणि शेकडो विद्यार्थ्यांनी हा पेपर विकत घेतल्याचे चौकशी स्पष्ट झाले आहे. डॉ शिरूरे हे ज्या भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या इंग्लिश स्कुल चे अध्यक्ष आहेत त्या भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेत बोगस शालर्थ आयडी प्रकरणावरून मोठा वाद सुरु आहे. संस्थेच्या माजी अध्यक्षानी विद्यमान कार्यवाह यांच्यासह पदाधिकारी यांच्यावर कोट्यावधी रुपयांचा अपहार केल्याचा आरोप केला आहे. आता नीट प्रकरणात या संस्थेच्या डॉक्टर ची अटक झाल्याने मूळ भाशिप्र ही संस्था देखील अडचणीत येणार हे निश्चित झाले आहे.

## शेर-ए-पंजाब मौलाना उस्मान लुधियानवी यांचा चिखलीत ऐक्याचा संदेश

### आई-वडिलांची सेवा करा, गरिबांना मदत करा; नावासाठी नव्हे तर कामातून ओळख निर्माण करा – मौलाना उस्मान लुधियानवी

आष्टी । प्रतिनिधी

आई-वडिलांची सेवा करा. समाजसेवा अथवा प्रतिनिधित्व करायचे असेल तर गरिबांना प्रथम प्राधान्य द्या. नावासाठी नव्हे, तर आपल्या कामातून ओळख निर्माण करा. कुराण हा ग्रंथ सर्वांसाठी आहे, सर्व जाती-धर्मातील लोकांनी तो एकदा तरी वाचावा. जाती-धर्माच्या भिंती पाडून आपापसातील भांडणं थांबवा. स्वतःला हिम्मतवान समजत असाल तर गोरगरिबांना त्रास देऊ नका, असा ऐक्य, मानवता आणि समाजसेवेचा संदेश पंजाब राज्याचे शाही इमाम शेर-ए-पंजाब मौलाना उस्मानसाहेब लुधियानवी यांनी दिला.





मंगळवार (दि. १९) रोजी आष्टी तालुक्यातील चिखली येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. मौलाना उस्मानसाहेब लुधियानवी यांचे आष्टीत आगमन होताच सर्व धर्मीय बांधवांच्या वतीने विविध ठिकाणी उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. काही ठिकाणी जेसीबीद्वारे फुलांची उधळण करून त्यांचे स्वागत करण्यात आले.

आष्टी तालुक्यातील चिखली येथे मायनॉरिटी सोशल डेव्हलपमेंट बोर्ड अंतर्गत कार्यरत असलेल्या जामीया अबुल हसन संस्थेने २०२२ पासून शैक्षणिक, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य उभे केले आहे. संस्थेमध्ये विद्यार्थ्यांना उर्दू, अरबी शिक्षण, संगणकशास्त्र तसेच शालेय शिक्षण दिले जाते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये, संस्कार आणि देशभक्तीची भावना रुजविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात.

संस्थेच्या कार्याची माहिती घेतल्यानंतर मौलाना लुधियानवी यांनी संस्थेच्या उपक्रमांचे कौतुक करत समाधान व्यक्त केले. उपस्थितांना मार्गदर्शन करताना त्यांनी सामाजिक सलोखा, पालकसेवा, गरीबांविषयी संवेदनशीलता आणि मानवतेचा संदेश दिला.

या कार्यक्रमातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचा प्रभावी संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते.

यावेळी मुफ्ती शफिक साहेब मिल्ली, माजी आमदार साहेबराव दरेकर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख, देविदास धस, गणेश शिंदे, जि.प. सदस्य सतीश शिंदे, सभापती रमजान तांबोळी, काकासाहेब शिंदे, पत्रकार बबलू सय्यद, अण्णासाहेब साबळे, प्रा. निसार शेख, कासम शेख, मुजाहिद सय्यद, जावेद पठाण, शिवरायांचा मावळा समीर शेख यांच्यासह परिसरातील नागरिक आणि सर्व धर्मीय बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुंबईत मान्सूनपूर्व पावसाच्या सरी

## उकाड्यामुळे हैरान झालेल्या जनतेला दिलासा; हिंगोली, सोलापुरातही सरी; विदर्भातील उष्णतेची लाट कायम

मुंबई : गत काही दिवसांपासून वाढत्या तापमानाने मुंबईकरांच्या अंगाची अक्षरशः लाही - लाही होत होती. अल निनोच्या प्रभावामुळे यंदा मुबलक पाऊसपाणी होणार किंवा नाही? या चिंतेने नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. लोक चातक पक्षाप्रमाणे पावसाची वाट पाहत होते. त्यातच आज सकाळी मुंबईतील काही भागांत मान्सूनपूर्व सरींनी हजेरी लावल्यामुळे उकाड्यामुळे हैरान झालेल्या मुंबईकरांना मोठा दिलासा मिळाला. दरम्यान, विदर्भात उष्णतेची लाट अजून कायम असून, नागरिकांना अजूनही उन्हाच्या तीव्र झळांचा सामना करावा लागत आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, मुंबईत सध्या वाढत्या तापमानाने कहर केला आहे. काल येथील तापमान ३६ अंश सेल्सिअसच्या आसपास होते. अगोदरच दमट वातावरण आणि त्यात या वाढत्या ताममानामुळे नागरीक अक्षरशः हैरान झाले होते. पण आज सकाळी पावसाने मुंबईतील मुलुंड, घाटकोपर, कांजूरमार्ग, भांडुप आदी भागांतहजेरी लावली. सकाळच्या वेळी अचानक झालेल्या या पावसामुळे चाकरमान्यांची चांगलीच तारांबळ उडाली. पण काही वेळ बरसलेल्या पावसाच्या या




मान्सूनपूर्व सरींमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. हवामान खात्याने पुढील ३६ ते ४८ तासांत अनेक भागांत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे उकाडा काहीअंशी कमी होण्याची शक्यता आहे.मध्य महाराष्ट्रात पावसासाठी पोषक वातावरण तयार होत आहे. पुढील काही दिवसांत या भागांतही पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, नैऋत्य मोसमी वारे २६ मे च्या आसपास केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. त्यानंतर ते टप्प्याटप्याने पुढे सरकत जूनच्या पहिल्या आठवड्यात प्रथम मुंबई व त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचू शकतात. दुसरीकडे, हिंगोली व सोलापूर जिल्ह्यातील काही भागांत मान्सूनपूर्व पावसाच्या सरी कोसळल्या आहेत. यामुळे या भागांत आल्हाददायक वातावरण तयार झाले आहे. हिंगोलीच्या वसमत शहरासह तालुक्यात काही ठिकाणी पावसाच्या सरी कोसळल्या. या पावसामुळे नागरिकांची उकाड्यापासून सुटका झाली, पण शेतीचे काहीअंशी नुकसान झाले. तिकडे सोलापुरात आज सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. त्यानंतर शहरातील काही भागांत पावसाच्या रिमझिम सरी कोसळल्या. सोलापुरात मागील दीड महिन्यांपासून पारा ४० डिग्रीच्या पुढेच आहे. त्यामुळे आजच्या तुरळक पावसामुळे अबालवृद्ध सुखावून गेले. दरम्यान, विदर्भातील उष्णतेची लाट अद्यापही कायम आहे. येथील काही जिल्ह्यांना पुढील ३ दिवस उष्णतेचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. प्रशासनाने या प्रकरणी जनतेला योग्य ती काळजी घेण्याचेही आवाहन केले आहे.

## जमिनीसाठी गंधकाची कमतरता ओळखा

गंधक पिकातील हरितद्रव्यनिर्मितीची आणि प्रकाश संश्लेषणाची प्रक्रिया वाढविण्यास मदत करते याशिवाय गंधक बीज निर्मिती प्रक्रियेमध्ये मदत करते. उच्च प्रतीच्या शेतमालाची निर्मिती होण्याकरिता मदत करते. वनस्पतीमधील पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता वाढविते. पिकामध्ये गंधक कमतरतेची लक्षणे साधारणतः पिकाच्या काढणीच्या अवस्थेत दिसून येतात. त्यामुळे जमिनीतील गंधकाची कमतरता ओळखून पुढील हंगामातील पिकांच्या चांगल्या उत्पादनासाठी प्रयत्न करता येतात.

जमिनीमध्ये गंधक कमतरतेची कारणे : मातीच्या ऱ्हासामुळे आणि निचऱ्यामुळे जमिनीतील गंधकाचे प्रमाण घटते. गंधकविरहित किंवा गंधकाचे प्रमाण अतिशय कमी असलेल्या खतांचा वापर केल्यामुळे जमिनीतील गंधकाचे प्रमाण कमी होते. शेतातील पिकांचे अवशेष, सेंद्रिय खते आणि काडी कचरा जमिनीतच न कुजवल्यामुळेही जमिनीत गंधकाची कमतरता दिसून येते.

पिकातील गंधक कमतरतेची लक्षणे : कडधान्य वर्गीय पिकाच्या मुळावर असणाऱ्या नत्र स्थीरीकरण करणाऱ्या गाठीच्या संखेत घट होते. त्यामुळे नत्र स्थीरीकरणाचे प्रमाण कमी होते. फळे पूर्णपणे परिपक्व होत नाहीत. पिकांमध्ये प्रकाश संश्लेषणाची क्रिया आणि हरित द्रव्याची निर्मिती मंदावलेली दिसते. रुंद पाने असलेली पिकाची पाने चुरडलेली दिसतात. गळित धान्यातील दाण्याचा आकार, तजेलदारपणा त्यातील तेलाचं प्रमाण कमी झालेलं दिसते. फळातील एकूण विद्राव्य घनपदार्थांचं प्रमाण कमी होतं आणि नत्र देऊनही हिरवी होत नाहीत. पीक व्यवस्थापन करताना मुख्यतः नत्र, स्फुरद व पालाश या अन्नद्रव्यांचा वापर केला जातो. त्यामुळे उर्वरित अन्नद्रव्यांची कमतरता वाढत जाते. अलीकडे जमिनीत गंधकाची कमतरता जाणवू लागली आहे. गंधक मातीचा सामू कमी करण्याचं काम करतो. त्यामुळे चुनखडीयुक्त चोपण जमिनीमध्ये त्याचा वापर अत्यंत महत्त्वाचा ठरतो. गंधक हे पिकाच्या वाढीसाठी दुय्यम अन्नघटक असला तरी. संशोधनावरून गंधक वनस्पतीच्या वाढीसाठी मुख्य अन्नद्रव्य गणले जाऊ लागले आहे. त्यामुळे आपल्या जमिनीतील गंधकाची कमतरता ओळखून वेळेवर उपाय करणे गरजेचे आहे.



## उसाच्या पाचटाचे व्यवस्थापन



महाराष्ट्रात जवळजवळ १० लाख हेक्टर क्षेत्रावर ऊस लागवड केली जाते व त्यापासून मोठ्या प्रमाणात उसाचे पाचट उपलब्ध होते. उसाच्या पाचटात ०.४ ते ०.५० टक्के नत्र, ०.१५ ते ०.२० टक्के स्फुरद आणि .९ ते १ टक्के पालाश तसेच ३२ ते ४० टक्के सेंद्रिय कर्ब असते. असे पाचट जाळल्यामुळे त्यातील सेंद्रिय कर्बाचा पुर्णत: नाश होतो. पाचटातील नत्र आणि स्फुरदाचा ९० टक्क्यांहून अधिक भाग जळून जातो, केवळ पालाश काही प्रमाणात शिल्लक राहते. परंतु अजूनही ऊस उत्पादक शेतकरी उसाचे पाचट मोठ्या प्रमाणात जाळून होणा-या नुकसानीमध्ये भर घालत आहेत.

महाराष्ट्रात जवळजवळ ४० ते ४५ टक्के क्षेत्रावर घेतल्या जाणा-या खोडव्यापैकी पाचटाचा वापर मात्र १ टक्के क्षेत्रावरही होत नाही. हे थांबविण्यासाठी पाडेगाव येथील ऊस संशोधन केंद्राने उसाच्या पाचटाचे व्यवस्थापन करण्याचे तंत्र विकसित केले आहे.

पाचटाची उपलब्धता :शेतातील ऊस तोडून गेल्यानंतर जी वाळलेली पाने शेतात पडतात, त्यास पाचट असे म्हणतात. पाचटामध्ये लिग्निन व मेणचट पदार्थाचे प्रमाण १५ टक्के असते. पाचटावर टोकदार केसासारखी कुसे असल्यामुळे जनावरे पाचट खात नाहीत. पाचटामध्ये ऊर्जा निर्मितीक्षमता कमी असते. शिवाय पाचट लवकर भरभर जळून राख होते.

त्यामुळे पाचटाचा उपयोग जाळण्यासाठी करता येत नाही. सर्वसाधारणपणे एक हेक्टर शेतातून ७.५ ते १० टन पाचट उपलब्ध होते व त्यापासून ४ ते ५ टन सेंद्रिय खत मिळते. महाराष्ट्रात उसाखालील क्षेत्र १० लाख हेक्टर असून त्यापासून ७५ ते १०० लाख टन पाचट मिळू शकते.

पाचटाचे फायदे :वेगळे सेंद्रिय खत घालण्याची गरज नाही, कारण पाचटाद्वारे हेक्टरी ४ ते ५ टन सेंद्रिय खत मिळते. पाचट आच्छादन म्हणून काम करते, त्यामुळे पाण्याची बचत होते. पाचटामुळे तणाची वाढ होत नाही.

हिरवळीसाठी किंवा शेणखतासाठी लागणा-या खर्चात बचत होते.पाचट जाळल्यामुळे होणारे तोटे :पाचट जाळल्यामुळे सेंद्रिय कर्ब, नत्र, स्फुरद व पालाश या अन्नद्रव्यांचा नाश होतो. जमीन तापल्यामुळे नत्र व इतर अन्नघटकांचा थोड्याफार प्रमाणात वायुरुपात नाश होतो. जमीन भाजल्यामुळे पाचट जाळल्यामुळे १० टक्के नत्र व ७५ टक्के इतर अन्नघटक वाया जातात. पाचटावर असलेले मित्रकीटक यांचा सुध्दा नाश होतो.

## पशुधनाच्या चाऱ्यासाठी शेवगा उत्तम पर्याय

शेवगा ही जगातील अतिशय उपयुक्त वनस्पती आहे. ही वनस्पती जलद वाढणारी आहे. उष्णकटिबंधीय प्रदेशात मानवी अन्न, पशुधनाचा चारा, औषधी उपयोग, जलशुद्धीकरण आणि रंगद्रव्ये इत्यादी करिता या वनस्पतीची लागवड करण्यात येते. शेवग्याचे हे सर्व उपयोग लक्षात घेता, शेवग्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. शेवग्याची पाने ही पशुधनासाठी उत्तम प्रकारचा चारा आहे.

शेवग्याचे पोषणमूल्य : शेवग्याची लागवड कोरडवाहू क्षेत्रातही करता येते. या वनस्पतीत टॅनिन, ट्रायपीसीन आणि अमायलेज या घटकांचे प्रमाण अतिशय कमी असते. शेवगा या वनस्पतीचे उत्पादन (शुष्क) २४ टन प्रति हेक्टर, प्रति वर्ष मिळते. या वनस्पतीतील प्रथिनांचे प्रमाण १९.३ ते २६.४ टक्के असते. शेवग्याच्या ताज्या पानांचा विविध पशुधनाच्या आहारामध्ये समावेश करता येतो. पशुधनास शेवग्याची पाने खाऊ घातल्याने मेंढ्यांच्या वजनामध्ये वाढ, दुध उत्पादनात वाढ आणि शेळ्यांच्या पचनशक्तीमध्ये सुधारणा आढळून आलेली आहे. शेवग्याची पाने वाळवून सुद्धा पशुधनास खाऊ घालता येऊ शकतात. शेवग्याच्या पानामध्ये सर्वसाधारणपणे २१.८ टक्के प्रथिने, २२.८ टक्के तंतुमय पदार्थ, ४.१२ टक्क स्निग्ध पदार्थ, २१.१२ टक्के कर्बोदके आढळून येतात. शेवगा वनस्पतीमध्ये चांगल्याप्रकारे रोगप्रतिकारक शक्ती



असते. तथापि, खूप दाटीने लागवड केल्यास, रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. असिफिड्स, पांढरी माशी, पाने खाणारी अळी या किटकांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. कडूनिंबाच्या बियापासून तयार केलेल्या अर्काची फवारणी केल्यास या किटकांचा प्रादुर्भाव आटोक्यात येतो.

पशुधनाच्या चाऱ्यासाठी चांगला पर्याय :शेवगा ही वनस्पती पशुधनाच्या चाऱ्यासाठी चांगला पर्याय आहे. शेवगा या वनस्पतीची बियापासून व कलमापासून लागवड करता येते. या वनस्पतीला तुलनात्मकदृष्ट्या पाण्याची व मूलद्रव्यांची गरज कमी असते. या वनस्पतीपासून चांगल्या प्रमाणात व उत्तम गुणवत्तेचा चारा उपलब्ध होतो. कमी पर्जन्यकाळात शेवगा या वनस्पतीपासून मिळणारा चारा पशुधनाची गरज भागवू शकतो. शेवगा या वनस्पतीची लागवड बांधावर आंतरपीक म्हणून, उष्णप्रदेशात व कमी पर्जन्यमानात करता येऊ शकते. त्यामुळे शेवगा ही वनस्पती पशुधनाच्या चाऱ्यासाठी उत्तम पर्याय आहे.

खत व्यवस्थापन :शेवगा या वनस्पतीपासून जास्तीत जास्त उत्पन्नासाठी चांगल्या प्रकारे कुजलेले शेणखत शेतात पसरणे आवश्यक आहे. १० ते १५ मे. टन शेणखत प्रतिहेक्टरी देण्यात यावे. शेवगा या वनस्पतीची उंची अडीच फूट (७५ सें.मी.) झाल्यानंतर, प्रत्येक रोपास १०० ग्रॅम युरिया, १०० ग्रॅम सुपर फॉस्फेट आणि ५० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश देण्यात यावे.

कापणी कधी करावी :शेवग्याच्या पानाची कापणी ही वनस्पतीची सर्वसाधारण उंची १.५ ते २ मीटर (लागवडीनंतर ६० ते ९० दिवस) झाल्यानंतर करण्यात यावी. कापणी करीत असताना जमिनीपासून २० ते ४५ सें.मी. उंचीवर कापणी करावी. त्यामुळे नवीन अंकूर फुटण्यासा वाव मिळतो. त्यानंतरची कापणी प्रत्येकी ३५ ते ४० दिवसांनी घेण्यात यावी. शेवगा या वनस्पतीची आंतरपीक म्हणून लागवड केल्यास, २ ते ४ महिन्याच्या अंतराने कापणी करावी. अशावेळी कापणी करताना, दुसऱ्या आंतरपीकावर शेवगा या वनस्पतीच्या सावलीचा विपरीत परिणाम होणार नाही, याची काळजी घ्यावी.

सुधारित जाती :तमिळनाडू कृषि विद्यापीठ, कोईमतूर या संस्थेने केलेल्या शेवगा या वनस्पतीच्या सीओ-१ आणि पीकेएम या सुधारीत जाती आहेत. याशिवाय जाफना मोरिंगा, चिंवचेरी मोरिंगा, चोमोरिंगा, याजपणाम मोरिंगा, पानमोरिंगा आणि धनराज या जाती आहेत.




### जागतिक दिवस

राष्ट्रकुल दिन

जागतिक स्किझोफ्रेनिया जागरूकता दिन

### महत्वाच्या घटना

१६२६ : पीटर मिन्युईटने स्थानिक लोकांकडून मॅनहटन बेट २४ डॉलरला विकत घेतले.
१६५३ : साली जर्मन देशाच्या संसदेने फर्डिनेंड द्वितीय यांना ऑस्ट्रिया देशाचे राजा म्हणून घोषित केलं.
१८३० : अमेरिकेमध्ये पहिल्यांदा प्रवासी रोडरेल सेवा सुरु करण्यात आली.
१८४४ : तारायंत्राचे संशोधक सॅम्युअल मोर्स यांनी स्वत: विकसित केलेल्या सांकेतिक भाषेत पहिला संदेश वॉशिंग्टन येथून बाल्टिमोर येथे पाठवला.
१८७५ : ब्रिटीश कालीन भारतात सर सैय्यद अहमद खान यांनी अलीगढ येथे मुहम्मद एंग्लो ओरिएन्टल शाळेची स्थापणा केली. वर्तमानात त्या शाळेलाच अलिगढ मुस्लीम विश्व विद्यालय म्हणून ओळखले जाते.
१८८३ : न्यूयॉर्क मधील ब्रूकलिन ब्रिज वाहतुकीस खुला झाला.
१९३१ : अमेरिकेतील वाल्टमोर ओहियो या रेल्वे मार्गावर पहिली वातानुकुलीत प्रवासी रेल्वे सुरु करण्यात आली.
१९४० : इगोर सिकोरसकी यांनी एका-रोटर हेलिकॉप्टर चे यशस्वी उड्डाण केले.
१९७६ : ध्वनीपेक्षा अधिक वेगाने जाणार्या कॉँकॉर्ड विमानाची लंडन ते न्यूयॉर्क अशी सेवा सुरू झाली.
१९८६ : इजराईल देशाचा दौरा करणाऱ्या मार्गरेट थैचर या ब्रिटन देशाच्या पहिल्या पंतप्रधान ठरल्या.
१९९१ : एरिट्रियाला (इथिओपियाकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९९४ : २६ फेब्रुवारी १९९३ रोजी न्यूयॉर्क येथील वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये बॉम्बस्फोट घडवून आणणार्या चार मुस्लीम दहशतवाद्यांना प्रत्येकी २४० वर्षे कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली.
२००० : भारतीय अवकाश संशोधन संस्थेने विकसित केलेला 'इन्सॅट-३बी' हा उपग्रह पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते राष्ट्राला अर्पण
२००१ : १८ व्या वर्षी माऊंट एव्हरेस्ट शिखर सर करणारा शेर्पा तेब्बा त्रेथी सर्वात लहान व्यक्ती ठरला.
२००४ : उत्तर कोरीय देशाने आपल्या देशांत मोबाईल फोनवर प्रतिबंध लावला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६८६ : डॅनियल फॅरनहाइट - जर्मन शास्त्रज्ञ (मृत्यू: १७३६)
१८१९ : व्हिक्टोरिया - इंग्लंडची राणी (मृत्यू: २२ जानेवारी १९०१)
१८४९ : सुप्रसिध्द डॉ. शास्त्रज्ञ ले. खर्नल कान्होबा रणछोडदास कीर्तीकर यांचा जन्म.
१८९६ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील पंजाब राज्यातील थोर स्वातंत्र्य सेनानी व शहीद कम्युनिस्ट क्रांतिकारक आणि गदार पार्टीचे सदस्य कर्तारसिंग यांचा जन्मदिन.
१९२४ : रघुवीर भोपळे ऊर्फ 'जादूगार रघुवीर' - आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जादूगार. त्यांनी 'फिरता जादूगार' व 'मी पाहिलेला रशिया' ही पुस्तके लिहिली आहेत. (मृत्यू: २० ऑगस्ट १९८४)
१९३३ : हेमचंद्र तुकाराम तथा बाळ दाणी - रणजी व कसोटी क्रिकेटपटू, कुशल क्रीडा संघटक (मृत्यू: १९ डिसेंबर १९९९)
१९४२ : माधव गाडगीळ - पर्यावरणतज्ञ
१९५२ : माजी भारतीय परराष्ट्र सचिव आणि ब्रिटनमधील भारतीय उच्चायुक्त रंजन मथाई यांचा जन्मदिन.
१९५४ : पद्मश्री व पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय गीर्यरोहक बचेंद्री पाल यांचा जन्मदिन.
१९७३ : भारतीय दिग्दर्शक, निर्माता आणि पटकथालेखक शिरीष कुंदर यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५४३ : निकोलस कोपर्निकस - सूर्यकेन्द्री विश्वाच्या संकल्पनेचा सिद्धांत मांडणारा पोलिश खगोलशास्त्रज्ञ आणि गणितज्ञ (जन्म: १९ फेब्रुवारी १४७३)
१८७९ : प्रख्यात अमेरिकन निर्मूलन, पत्रकार, उपग्रहवादी आणि समाजसुधारक विल्यम लॉयड गॅरिसन यांचे निधन.
१९५० : भारताचे वे४३ गर्वनर जनरल आर्चिबाल्ड वावेल यांचे निधन. (जन्म: ५ मे १८८३)
१९८४ : डब्ल्यू.डब्ल्यू.ई. चे स्थापक विन्स मॅकमोहन सीनिय यांचे निधन. (जन्म: ६ जुलै १९१४)
१९९० : लोकसभेचे माजी अध्यक्ष के. स. हेगडे यांचा मृत्यू.
१९९३ : बुलो चंदीराम रामचंदानी ऊर्फ बुलो सी. रानी - जुन्या पिढीतील संगीतकार व गायक (जन्म: ६ मे १९२० हैदराबाद)
१९९५ : हॅरॉल्ड विल्सन - इंग्लंडचे पंतप्रधान (जन्म: ११ मार्च १९१६)
१९९९ : विजयपाल लालाराम तथा 'गुरू हनुमान' - पद्मश्री आणि द्रोणाचार्य पुरस्कार विजेते कुस्ती प्रक्षिशक (जन्म: १५ मार्च १९०१)
२००० : मजरुह सुलतानपुरी - दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते (१९९३) शायर, गीतकार आणि कवी (जन्म: १ आक्टोबर १९१९)
२०१४ : प्रसिद्ध भारतीय लेखिका व भारतीय राज्य राजस्थानमधील भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस पक्षाच्या सदस्या लक्ष्मी कुमारी चुंडावत यांचे निधन.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# जालना येथे रेशीम विणकाम वाढविण्यास मोठी संधी-आशिमा मित्तल

जालना। प्रतिनिधी

कृषी विज्ञान केंद्र, खरपुडी येथे आयोजित करण्यात आलेल्या रेशीम हातमाग प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप व प्रमाणपत्र वितरण सोहळा आज उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात जिल्ह्यातील महिलांना रेशीम साडी विणकामाच्या माध्यमातून स्वावलंबी बनविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, जालना येथे रेशीम विणकाम वाढविण्यास मोठी संधी उपलब्ध झाली आहे.

जालना जिल्ह्यात कोष बाजारपेठ, रेशीम धागा निर्मिती आदी प्रक्रिया सुरू असून आता त्यापुढील टप्पा म्हणून रेशीम साडी विणकामाचे काम सुरू करून एक नाविन्यपूर्ण आदर्श निर्माण करण्यात आला आहे. जालना जिल्ह्यास व्यापाराचा समृद्ध वारसा लाभला असून येथे अनेक उद्योजक कार्यरत आहेत.



त्यामुळे केवळ ३० महिला विणकरांपुरते हे कार्य मर्यादित न ठेवता पुढील काळात आणखी ५०० महिलांना रेशीम विणकामाचे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच प्रशिक्षणार्थी महिलांनी विणकामात अधिक प्राविण्य मिळवून आकर्षक डिझाईन्स व भरजरी उत्पादने तयार करावीत, असे आवाहनही त्यांनी केले.

कापसे फाउंडेशनचे संस्थापक बाळासाहेब कापसे यांनी प्रशिक्षणार्थी महिलांना सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. अधिक प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या महिलांना मोफत प्रशिक्षण तसेच मोफत हातमाग उपलब्ध करून देण्यात येतील. महिलांनी तयार केलेल्या रेशीम साड्यांच्या विक्रीची हमी देखील त्यांनी दिली.

मराठवाडा शेती सहाय मंडळाचे सेक्रेटरी कृषीरत्न श्री. विजय आण्णा बोराडे यांनी कृषी विज्ञान केंद्र सदैव प्रशिक्षणार्थी महिलांच्या पाठीशी राहील, असे सांगितले. महिलांना आवश्यक पुढील कौशल्य प्रशिक्षण दिले जाईल तसेच ग्रामीण भागातील महिलांनी पुढाकार घेऊन आर्थिक उन्नती साधावी, असे आवाहन त्यांनी केले. प्रशिक्षणार्थी महिला सौ. निता नागवे, सौ. सरीता निकाळजे आणि सौ. गंगाबाई कचरे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ''आम्ही आता रेशीम साडीचे विणकाम करू शकतो, याचा आम्हाला खूप आनंद आहे. या प्रशिक्षणामुळे कौशल्य आत्मसात झाले असून आमचा आत्मविश्वास वाढला आहे. तसेच सन्मानाने रोजगार व उत्पादन वाढविण्याचा मार्ग उपलब्ध झाला आहे.

## हिंगोलीत राजकीय भुकंप:माजी समाजकल्याण सभापती मुनीर पटेलांचा शिंदेसेनेत प्रवेश

### वसमत, औंढा तालुक्यात पक्षाला बळ मिळणार

हिंगोली। प्रतिनिधी

कॉँग्रेस, राष्ट्रवादी पुन्हा कॉँग्रेस अन राष्ट्रवादी असा राजकिय प्रवास करीत माजी समाज कल्याण सभापती मुनीर पटेल यांनी अखेर शिंदेसेनेचा धनुष्यबाण हाती घेतला आहे. गुरुवारी ता. २१ मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमदार संतोष बांगर यांच्या उपस्थितीत त्यांनी शिंदेसेनेत प्रवेश केला आहे. त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे शिंदेसेनेला वसमत व औंढा नागनाथ तालुक्यात बळ मिळणार आहे.

हिंगोली जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती मुनीर पटेल हे राजकिय क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तीमत्व म्हणून ओळखले जाते. हिंगोली जिल्हा परिषदेत समाज कल्याण सभापती असतांना त्यांनी गरजूंना योजनांचा लाभ मिळवून दिला. या शिवाय चुकीच्या प्रश्नावर जिल्हा प्रशासनाला धारेवर धरण्याचे कामही त्यांनी केले. दरम्यान, कॉँग्रेस पक्षानंतर त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. मात्र राष्ट्रवादीत त्यांचे जास्त काळ मन रमलेच नाही. त्यांनी पुन्हा कॉँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांच्यावर जिल्हाध्यक्षाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. हि जबाबदारीही त्यांनी पार पाडली. त्यांनी पुन्हा राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. मागील काही दिवसांपासून ते राजकिय क्षेत्रापासून बाजूला झाले होते. त्यांचा जनसंपर्क व नागरीकांचे प्रश्न सोडविण्याची हातोटी लक्षात घेऊन शिंदेसेनेने त्यांना पक्षात घेण्याचे प्रयत्न चालविले होते. त्यासाठी आमदार संतोष बांगर यांनी पुढाकार घेतला होता. त्यानंतर त्यांनी कार्यकर्त्यांसह मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदेसेनेत प्रवेश केला. यावेळी आमदार बांगर यांच्यासह शिंदेसेनेचे वसमत तालुकाध्यक्ष राजू चापके, युवा जिल्हा प्रमुख राम कदम, नगरसेवक गुड्डू बांगर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, मुनीर पटेल यांच्या शिंदेसेनेतील प्रवेशामुळे वसमत व औंढा नागनाथ तालुक्यात पक्षाला मोठे बळ मिळणार असून आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत पक्षाला चांगलाच फायदा होणार असल्याचे राजकिय वर्तुळातून बोलले जात आहे.

## || थोडक्यात

### जालना जिल्हा घरगणना मोहिमेत राज्यात अव्वल

जालना। प्रतिनिधी

जनगणना २०२७ अंतर्गत सुरू असलेल्या घरगणना कार्यक्रमात जालना जिल्ह्याने महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या या मोहिमेत जालना जिल्ह्याने राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सर्वाधिक प्रगती साधली आहे. राज्यस्तरीय आढाव्यानुसार, जालना जिल्ह्यातील एकूण २८६३ पैकी २७०८ चे काम पूर्ण झाले असून, जिल्ह्याने तब्बल ९४.५९ टक्के प्रगती साधली आहे. ही प्रगती राज्यातील सर्वाधिक असून, जिल्हा प्रशासनाच्या नियोजनबद्ध कार्यपद्धतीची आणि कर्मचाऱ्यांच्या समन्वयाची ही मोठी पावती मानली जात आहे. जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा जनगणना कक्ष, पर्यवेक्षक, प्रगणक अधिकारी आणि संबंधित कर्मचाऱ्यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा करत ही कामगिरी साध्य केली आहे. प्रशासनाच्या काटेकोर नियोजनामुळे आणि कर्मचाऱ्यांच्या मेहनतीमुळे घरगणना मोहिमेला वेग मिळाला असल्याचे स्पष्ट होत आहे. या यशाबद्दल जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले असून, उर्वरित कामही निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, जनगणना-२०२७ ही देशाच्या नियोजन प्रक्रियेसाठी अत्यंत महत्त्वाची मोहीम असल्याने नागरिकांनीही प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ‘पुतळा समितीची बैठक

जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यातील पुतळे आणि स्मारकांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आज ‘पुतळा समिती’ची आढावा



बैठक पार पडली. यावेळी बैठकीस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल तसेच विविध संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी बैठकीत मुख्यत्वे जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक पुतळ्यांच्या परिसरातील कायदा, सुव्यवस्था आणि सुरक्षिततेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. संवेदनशील ठिकाणांवर विशेष पोलीस गस्त ठेवण्याबाबत तसेच सीसीटीव्ही यंत्रणा प्रभावीपणे कार्यान्वित करण्याबाबत पोलीस अधीक्षकांशी चर्चा झाली. जिल्हाधिकारी यांनी महापुरुष आणि क्रांतीकारकांच्या पुतळ्यांच्या परिसराची नियमित स्वच्छता, रंगरंगोटी व योग्य देखभाल राखण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना तातडीने आवश्यक सूचना देण्याचे निर्देश दिले. याशिवाय, कोणत्याही ठिकाणी नियमांचे उल्लंघन करून किंवा विनापरवाना पुतळे उभारले जाणार नाहीत, याची दक्षता प्रशासनाने घेण्याचे आदेशही जिल्हाधिकारी यांनी दिले. बैठकीत प्रशासनाने पुतळ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करत असल्याचे स्पष्ट केले असून, नागरिकांनी देखील या नियमांचे पालन करण्यास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

### अपंग प्रशिक्षण केंद्रात ३० जून पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

जालना। प्रतिनिधी

दिव्यांग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे मार्फत शासन मान्यता प्राप्त तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र, देगलूर या संस्थेत म.रा. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परीक्षा मंडळ मुंबई मार्फत मान्यता प्राप्त अभ्यासक्रमासाठी १८ ते ४० वयोगटातील दिव्यांग (अस्थिव्यंग, मुकबधीर, अंध, मतिमंद) मुला- मुलींना प्रवेश देण्यात येत आहे. या प्रशिक्षण केंद्रात विद्युत तारतंत्री, सर्व्हिसिंग ऑफ इलेक्रिर क डोमेस्टिक ऍप्लायंसेस, मोबाईल रिपेअरिंग अँड सर्व्हिसिंग, फिटर, एलिमेंट ऑफ कॅम्प्यु टिर इंजीनिअरिंग, कॉम्प्युटर ऑपरेशन विथ एम.एस. ऑफिस, डेस्कटॉप पब्लिशिंग डीटीपी, कॉम्प्युटर अकाँटिंग व ऑफिस ऑटोमेशन व अरबत्ती, खडू, धुप बनवणे इत्यादी अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यात येत आहे. तरी इच्छुक दिव्यांग (अस्थिव्यंग, मुकबधीर, अंध, मतिमंद) मुला- मुलींनी किंवा पालकांनी दि ३० जुन २०२६ पर्यंत तुळजा भवानी अपंग प्रशिक्षण केंद्र,भायेगाव रोड, देगलूर ता. देगलुर जि. नांदेड येथे पत्रव्यवहार करावे किंवा समक्ष भेटण्याचे आवाहन प्राचार्यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## इंधन टंचाईचा पर्यटनाला फटका; वेरूळला पर्यटक संख्या ५०० वर

वेरूळ । प्रतिनिधी

जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून निर्माण झालेल्या पेट्रोल-डिझेलच्या टंचाईचा फटका जागतिक वारसा स्थळ असलेल्या ऐतिहासिक वेरूळ लेणीच्या पर्यटनाला बसला आहे. ऐन उन्हाळी सुट्ट्यांच्या हंगामात इंधनाअभावी वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे. देश-विदेशातील पर्यटकांनी वेरूळकडे पाठ फिरवली आहे. दररोज सहा हजारांवर भेटी देणाऱ्या पर्यटकांची संख्या आता पाचशेवर पोहोचली आहे. नेहमी गजबजलेला लेणी परिसर सध्या पूर्णपणे ओस पडला असून, व्यावसायिक हवालदिल झाले आहेत. पुरातत्त्व विभागाकडून मिळालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात तब्बल १ लाख पर्यटकांनी वेरूळ लेणीला भेट दिली होती. मात्र, यंदाच्या एप्रिल महिन्यात हा आकडा घसरून ७० हजारांवर आला आहे. सर्वात भीषण परिस्थिती चालू मे महिन्यात पाहायला मिळत आहे. सामान्यतः मे महिन्यात दररोज चार ते पाच हजार पर्यटक वेरूळात येत असतात. मात्र, सध्या उन्हाचा तीव्र तडाखा आहे. इंधन टंचाईने परिस्थिती आणखी बिघडली आहे. त्यामुळे हा आकडा दररोज अवघा ५०० ते ६०० पर्यटकांवर येऊन ठेपला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती असलेल्या या जागतिक वारशासाठी येणाऱ्या परदेशी पर्यटकांची संख्या अवघी १० ते २० वर आली आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालयाने तेल कंपनी प्रतिनिधींची बैठक घेतली आहे. उन्हाळी सुट्ट्यांमध्येही पर्यटक संख्या घटलेली इंधन टंचाईमुळे शनिवार आणि रविवारच्या सुट्ट्यांमध्येही पर्यटकांची संख्या वाढलेली नाही. छत्रपती संभाजीनगर शहरातून वेरूळकडे जाणाऱ्या परिवहन महामंडळाच्या ६० टक्के फेऱ्या डिझेलअभावी रद्द कराव्या लागल्या आहेत.

## सोनलनगर येथे महिलांसाठी विविध कार्यक्रम उत्साहात

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील सोनलनगर येथील श्री संत गजानन महाराज संस्थान या परिसरात दिनाक २१ मे २०२६ गुरुवार रोजी महिलांसाठी मनोरंजन, माहिती आणि उत्साहाचा संगम ठरलेल्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन तर्फे करण्यात आले. हा कार्यक्रम जालना महानगर पालिकेच्या महिला व बालकल्याण सभापती यांनी प्रभाग नऊ मधील महिलांसाठी आयोजित केला होता.या कार्यक्रमाचे सूत्र संचलन श्री अक्षय बोरुडे यांनी केले या कार्यक्रमाला परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमामध्ये झी टीव्हीवर प्रसारित होत असलेल्या लोकप्रिय मालिकांची माहिती उपस्थित महिलांना देण्यात आली. या मालिकांमधील भूमिका साकारत असलेल्या व्यक्तीवर प्रश्न विचारण्यात आले ज्या महिलांनी बरोबर उत्तर दिले त्यांना स्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळाली त्या महिलांसोबत विविध स्पर्धा घेण्यात आली.

मालिकांमधील सामाजिक संदेश, कौटुंबिक मूल्ये आणि मनोरंजनाचा भाग



याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी महिलांनीही मालिकांविषयी आपली मते व्यक्त करत संवाद साधला. महिलांच्या मनोरंजनासाठी विविध खेळ, स्पर्धा व मनोरंजक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. खेळांमध्ये सहभागी झालेल्या महिलांनी उत्साहाने सहभाग नोंदवत कार्यक्रमात रंगत आणली. विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमात आनंदी व उत्साही वातावरण पाहायला मिळाले. महिलांनी अशा प्रकारचे कार्यक्रम समाजात एकोपा वाढविणारे व महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारे असल्याची भावना व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल श्री गजानन महाराज संस्थान चे अध्यक्ष व सर्व विश्वस्त यांनी परिश्रम घेतले यावेळी संस्थांच्या वतीने आयोजकांचे व झी टी व्ही यांचे आभार मानले. यावेळी सौ संध्याताई देठे यांचा सत्कार सौ दीपाताई तोंडे यांनी केला तर झी टी व्ही चे अँकर श्री अक्षय बोरुडे यांचा सत्कार श्री ॲड रवींद्र डुरे यांनी केला . उपस्थित महिलांकडून या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल कौतुक करण्यात आले. कार्यक्रम झाल्यानंतर सर्व उपस्थित असलेल्या महिलाना व इतर नागरिकांना श्री गजानन महाराज संस्थान यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी झी टी व्ही मार्केटिंग टीमचे प्रमुख श्री सुंदर कदम व त्यांच्या सर्व टीमने खूप मेहनत घेतली.

## भास्कर दानवे यांच्या उमेदवारीसाठी कार्यकर्त्यांचा आग्रह

जालना। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीत भारतीय जनता पार्टीत संघटन बांधणीत आयुष्य घालवलेल्या आणि तळागाळातील कार्यकर्त्यांशी मजबूत नाळ असलेल्या भास्कर आबा दानवे यांना उमेदवारी द्यावी, अशी जोरदार मागणी भाजपा जालना महानगरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केली आहे. यासंदर्भात माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर व जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष नारायण कुचे यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, भास्कर आबा दानवे यांनी गेली अनेक वर्षे जालना विधानसभा मतदारसंघात पूर्णवेळ पक्ष संघटना मजबूत करण्याचे काम केले आहे. बूथ स्तरापासून शहर व ग्रामीण भागापर्यंत भाजपा विचार पोहोचवण्यासाठी त्यांनी सातत्याने मेहनत घेतली. पक्षाच्या अडचणीच्या काळातही कार्यकर्त्यांना बळ देत संघटना टिकवून ठेवण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. भास्कर आबा दानवे यांनी जालना नगरपरिषद



उपनगराध्यक्ष, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष, विधानसभा प्रमुख तसेच सध्या महानगर जिल्हाध्यक्ष म्हणून जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. पक्ष संघटनेत दीर्घकाळ सक्रिय राहून त्यांनी हजारो कार्यकर्त्यांशी थेट संपर्क निर्माण केला असून स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात त्यांची मजबूत पकड असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले.

पक्षासाठी निष्ठेने आणि सातत्याने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी देण्याची भाजपाची परंपरा आहे. त्यामुळे भास्कर आबा दानवे यांच्यासारख्या संघटन मजबूत करणाऱ्या नेतृत्वाला विधानपरिषदेची उमेदवारी देऊन न्याय मिळावा,'' अशी भावना यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, जिल्हा उपाध्यक्ष धनराज काबलिये, गटनेते महेश निकम, जिल्हा सरचिटणीस वसंत शिंदे, अमोल कारंजेकर, सुनील पवार, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, अमोल धानुरे, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, मनोज बिडकर, गोवर्धन कोल्हे, देविदास देशमुख, राजेश जोशी तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सराफा भागात नाले गिळून ओटे उभारले

जालना। प्रतिनिधी

जालना शहरात मनपा प्रशासनाकडून अतिक्रमण हटाव मोहीम जोरात सुरू आहे. कारवाई मात्र निवडक भागांपुरतीच मर्यादित आहे. हातावर पोट असलेल्या छोट्या व्यावसायिकांवरच बुलडोझर चालविला जात असल्याचा आरोप होत आहे. या पार्श्वभूमीवर दिव्य मराठी प्रतिनिधीने सराफा गल्ली, पाणी वेस, महात्मा फुले मार्केट, सदर बाजार रोड, मराठा बिल्डिंग, फुल बाजार या मुख्य भागांत जाऊन पाहणी केली. या भागांत दुकानांसमोर पक्के ओटे, लोखंडी शेड, सिमेंटच्या पायऱ्या उभारून व्यापाऱ्यांनी दोन्ही बाजूंनी रस्ते गिळंकृत केले आहेत. नाले गिळले आहेत. ओटे उभारल्याने पावसाळ्यात पाणी जाणार कुठे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. अनेक भागांत ६ मीटरही रस्ता शिल्लक नसल्याने कारही जात नाही. जालना शहरातील अतिक्रमणांची समस्या गंभीर झाली आहे. आयुक्त बदलले की काही दिवस अतिक्रमण हटाव मोहीम राबविली जाते.

त्यानंतर काही दिवसांत पुन्हा अतिक्रमणे जैसे थे होतात. शहरातील अनेक भागांत हातगाड्या, छोट्या टपऱ्या, झोपड्यांवर कारवाई होत असताना प्रभावशाली व्यापाऱ्यांच्या पक्क्या अतिक्रमणांवर मनपा प्रशासन मौन बाळगत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. विकास आराखडा पाहिला असता अनेक ठिकाणी रस्ते आणि सार्वजनिक जागा स्पष्टपणे दाखवण्यात आल्या आहेत. मात्र प्रत्यक्षात या जागांवर अतिक्रमण करून व्यापाऱ्यांनी ओट्यांचे जाळे उभारले आहे. जालन्यातील सराफा गल्लीत अशा प्रकारे दोन्ही बाजूंनी अतिक्रमण होऊन रस्ता निमुळता झाला. मुख्य बाजारात व्यापाऱ्यांनी नाल्यांवरच अतिक्रमणे केलेली असल्याने पावसाळ्यात पाणी जाणार कुठे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. गतवर्षी या पाण्यामुळेच जालना शहर तुंबले होते. अनेक कॉम्प्लेक्समध्येही पाणी घुसले होते. काही भागांत अतिक्रमणे काढली जात आहेत.

# धामणा धरणातील पाणीपातळी घटू लागली

### पाणीटंचाईचे सावट गडद, तापमानात वाढ झाल्यामुळे जलाशयातील पाण्याचे बाष्पीभवन

शेलूद। प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील उत्तर भागातील प्रमुख जलाशयांमध्ये शेलूद येथील धामणा धरणात गतवर्षीच्या तुलनेत यंदा अत्यल्प पाणीसाठा असल्यामुळे पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याचे चित्र दिसून येत आहे. उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असल्याने अनेक धरणे कोरडी पडण्याची भीती निर्माण होत आहे. त्यामुळे नागरिकांसह शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भोकरदन शहराला गतवर्षी पाणीपुरवठा करणाऱ्या बाणेगाव, जुई धरणासह धामणा धरणातील पाणीसाठा झपाट्याने घटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मागील काही दिवसांपासून तापमानात वाढ झाल्यामुळे जलाशयातील पाण्याचे बाष्पीभवन होत आहे. अवैध पाणीउपसाही वेगाने होत आहे. त्यामुळे उपलब्ध साठा दिवसेंदिवस कमी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

दरम्यान, काही गावांमध्ये आतापासूनच पाणीटंचाईची झळ जाणवू लागली आहे. शहरासह



ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवन या धरणांवर अवलंबून असल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात मान्सून दाखल होण्याची शक्यता असली तरी पाऊस लांबल्यास परिस्थिती अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. बाणेगाव धरण परिसरात काही ठिकाणी अवैध पाणीउपसा होत आहे. या प्रकारामुळे पाणीसाठ्यावर अतिरिक्त ताण येत आहे. भविष्यातील टंचाई तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. संबंधित विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. भोकरदन शहराची तहान भागवणाऱ्या जुई धरणातूनही मोठ्या प्रमाणावर पाण्याची चोरी होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. प्रशासनाने वेळीच कठोर उपाययोजना केल्या नाहीत तर आगामी काळात शहरासह ग्रामीण भागाला गंभीर पाणीटंचाईला सामोरे जावे लागू शकते, अशी भीती परिसरातील शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे. पाणी वापरात काटकसर गरजेची पावसाळा सुरू होईपर्यंत उपलब्ध पाण्याचा जपून वापर करणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळून काटकसरीने वापर केल्यास संभाव्य संकटाची तीव्रता कमी होऊ शकते. प्रशासनानेही पाणीपुरवठ्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करण्याची गरज व्यक्त होत आहे.

# आयुष्मान भारत योजनेचा लाभ आता घराघरात पोहोचवणार!

## आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील २५ हजार रुग्णांना मिळणार मोफत उपचाराचा आधार

आष्टी । प्रतिनिधी

आयुष्मान भारत योजनेचा लाभ आता शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी कंबर कसली असून आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यातील तब्बल २५ हजार रुग्णांना या योजनेचा थेट लाभ मिळवून देण्याचा निर्धार आयुष्मान भारत मिशन समिती महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी व्यक्त केला.

आष्टी येथे पार पडलेल्या आयुष्मान भारत मिशनच्या आढावा बैठकीत त्यांनी खासगी रुग्णालयांना थेट इशारा देत, गरीब रुग्णांची आर्थिक लूट करणाऱ्या हॉस्पिटलना कोणतीही दया दाखवली जाणार नाही. जादा बिल आकारणाऱ्यांवर थेट दंडात्मक कारवाई होईल, असा कडक शब्दांत इशारा दिला.

यावेळी आमदार सुरेश धस यांनीही आक्रमक भूमिका घेत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या २२ जुलै रोजी होणाऱ्या वाढदिवसानिमित्त आष्टी विधानसभा मतदारसंघात भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा केली. मुंबईतील तज्ज्ञ डॉक्टरांना थेट गावपातळीवर आणून गरीब रुग्णांवर उपचार केले जाणार आहेत. गुडघेदुखी, हृदयरोग, गंभीर व्याधींवरील तपासणी व उपचार मोफत केले जातील, असे त्यांनी सांगितले.





### गरिबांची लूट करणाऱ्या हॉस्पिटलवर थेट दंडात्मक कारवाई -डॉ. ओमप्रकाश शेटे

### २२ जुलैला भव्य महाआरोग्य शिबिर; मुंबईतील तज्ज्ञ डॉक्टर आष्टीत दाखल होणार -आ.धस

डॉ. शेटे यांनी सांगितले की, आयुष्मान भारत योजनेअंतर्गत आता प्रति कुटुंब ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार सुविधा उपलब्ध असून हृदय, यकृत, फुफ्फुस प्रत्यारोपणासाठी तब्बल २२ लाख रुपयांपर्यंत मदत दिली जात आहे. ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना अतिरिक्त ५ लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्यात आले आहे.

पूर्वी १३५६ आजारांवरील उपचारांना मंजुरी मिळत होती; मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारामुळे आता २३९९ व्याधींचा समावेश करण्यात आला आहे. राज्यातील सहभागी रुग्णालयांची संख्या १७९२ वरून थेट ४५३७ पर्यंत वाढविण्यात आली असून प्राथमिक आरोग्य केंद्रांमधूनही सेवा सुरू करण्यात आली आहे. आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील अनेक गरीब लाभार्थ्यांना शिधापत्रिकेअभावी आयुष्मान कार्ड ◀◀ पान ३ वर

# हॉटेल चालकाची चाकूने गळा चिरून निर्घृण हत्या; पैशाच्या वादातून मित्रांनीच केला घात

परळी । प्रतिनिधी



परळी वैजनाथ शहरात पैशांच्या किरकोळ वादातून एका हॉटेल चालकाची चाकूने गळा चिरून निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कारभारी नारायण आंधळे असे मृत व्यक्तीचे नाव असून, या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात दोन संशयित आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून एकास ताब्यात घेण्यात आले आहे. दारूच्या नशेत झालेल्या वादाचे रूपांतर थेट हत्येत झाल्याने परळी परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.

मृत कारभारी आंधळे हे परळीत पवन हॉटेल चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. २१ मे रोजी रात्री हॉटेल बंद झाल्यानंतर कारभारी आंधळे हे संशयित आरोपी सचिन सोमनाथ राठोड आणि सुमीत पवार यांच्यासोबत दारू पीत बसले होते. दारू पित असतानाच त्यांच्यात पैशांच्या देवाणघेवाणीवरून अचानक वाद सुरू झाला. या वादाचे रूपांतर पुढे हाणामारीत झाले. संशयित आरोपी सचिन राठोड याने कारभारी आंधळे यांना घट्ट पकडून ठेवले, तर सुमीत पवार याने आपल्या जवळील धारदार चाकूने कारभारी यांच्या मानेवर आणि हातावर सपासप वार केले. या प्राणघातक हल्ल्यात गंभीर जखमी झालेले कारभारी आंधळे रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर कोसळले.

घटना घडल्यानंतर संशयित आरोपी सचिन राठोड यानेच कारभारी आंधळे यांच्या लहान मुलाला फोन करून तुमचे वडील जखमी अवस्थेत पडले असल्याची माहिती दिली. ◀◀ पान ३ वर

# परळी पंचायत समितीत ग्रामसेवकांची कमतरता; नागरिकांची कामे रखडली

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी वैजनाथ पंचायत समिती अंतर्गत ग्रामसेवकांच्या रिक्त पदांचा प्रश्न गंभीर बनला असून याचा थेट परिणाम ग्रामीण भागातील नागरिकांच्या दैनंदिन कामांवर होत आहे. पंचायत समिती अंतर्गत ग्रामसेवकांची एकूण ६२ पदे मंजूर असताना त्यापैकी केवळ ५१ ग्रामसेवक कार्यरत आहेत, तर तब्बल ११ पदे रिक्त आहेत. त्यामुळे अनेक ग्रामसेवकांकडे अतिरिक्त गावांचा कारभार सोपविण्यात आला आहे.



सध्या अनेक ग्रामसेवकांकडे एका पदासोबत आणखी ३ ते ४ गावांचा अतिरिक्त कार्यभार असल्याने कामाचा मोठा ताण निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे अनेक ग्रामसेवक हे दररोज १०० ते १६० किलोमीटर अंतरावरून अपडाऊन करत असल्याची माहिती समोर आली आहे. शासनाने ग्रामसेवकांनी मुख्यालयी राहण्याचे आदेश दिले असले तरी प्रत्यक्षात या आदेशाला केराची टोपली दाखवण्यात येत असल्याचे चित्र दिसत आहे.

ग्रामसेवक मुख्यालयी राहत नसल्यामुळे ◀◀ पान ३ वर

# महसूल प्रशासन व आरटीओची वाळू माफियावर कारवाई; टोलनाक्यावर ६० लाखांचा मुद्देमाल जप्त

अंबड । प्रतिनिधी

अंबड महसूल प्रशासन व आरटीओ दोन्ही विभागाची वाळू माफ यावर संयुक्त कारवाई करण्यात आली सदरील वाळूचे वाहन अंबड तहसील कार्यालयामध्ये जप्त करण्यात आली. दोन हायवा चालकांवर गुन्हे दाखल करण्यात आला. सदरील कारवाई जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अप्पर जिल्हाधिकारी श्री मिसाळ यांच्या आदेशावरून धडाकेबाज कारवाई करण्यात आली.



उपविभागीय अधिकारी आणि घनसावंगी अंबड तहसीलदार यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत सदरील कारवाई करण्यात आली . गोदावरी पात्रातून विनापरवाना वाळू चोरी करून घेऊन जाताना पकडली.

गोदावरी नदीपात्रातून बेकायदेशीरपणे वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्या माफियांविरुद्ध अंबड ◀◀ पान ३ वर

# परंपरेने नगद नारायणाची सेवा मिळते हे भाग्य - महंत लक्ष्मण महाराज मेंगडे

## अधिकमासानिमित्त नगद नारायण गडावर भव्य अखंड हरिनाम सप्ताह सुरुवात

बीड । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र नगद नारायण गडाची परंपराही शेकडो वर्षाची आहे. संत बंकट स्वामी महाराज संस्थान आणि नगद नारायण गड तीन पिढ्यांचे संबंध आहेत. त्यामुळे परंपरेने नगद नारायणाची सेवा मिळते हे परम भाग्य

आहे. असे प्रतिपादन श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी केले. श्रीक्षेत्र नगद नारायण गडावर अधिक मासानिमित्त सुरू असलेल्या भव्य अखंड हरिनाम सप्ताहात पहिला दिवसाचे कीर्तन



पुष्पगुंपताना ते बोलत होते यावेळी प्रमुख उपस्थिती श्री.ह.भ.प महंत शिवाजी महाराज नारायण गडकर,श्री ह भ प महंत नवनाथ महाराज जरुडकर,श्री ह भ प संभाजी महाराज नारायणगडकर श्री ह भ प डॉ. नाना महाराज कदम,श्री ह भ प सुरेश महाराज जाधव, लक्ष्मण महाराज तकिक यांच्यासह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.

बीडच्या श्रीक्षेत्र नगद नारायण गडावर अधिक मासानिमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे.पहिला दिवसाचे कीर्तन पुष्प महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे संपन्न झाले. यावेळी त्यांनी संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या

मुक्त कासया म्हणावें ।
बंधन तें नाहीं ठावें ।।१।।
सुखें करितों कीर्तन ।
भय विसरलें मन ।।ध्रु.।।
देखिजेना नास ।
घालूं कोणावरी कास ।।२।।
तुका म्हणे साह्य ।
देव आहे तैसा आहे ।।३।।

या अभंगावर चिंतन मांडले. यावेळी त्यांनी महात्मा कुलभूषण नगद नारायण महाराज यांचे शेकडो वर्षाची पवित्र परंपरा आहे. अध्यात्माची क्रांती करण्याचे काम याच आध्यात्मिक विद्यापीठाने ◀◀ पान ३ वर

# तरुणीच्या मनाविरुद्ध साखरपुडा उरकून पोलीस उपनिरीक्षकाची फसवणूक

**जाब विचारताच २५ लाखांची खंडणी मागत वर्दी उतरवण्याची धमकी, तरुणीसह ९ जणांवर गुन्हा दाखल**

गेवराई । प्रतिनिधी

लग्नाची इच्छा नसतानाही केवळ पैसे उकळण्याच्या आणि फसवणुकीच्या उद्देशाने पोलीस उपनिरीक्षकाला साखरपुडा उरकून ४ लाख रुपये खर्च करायला लावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एवढेच नव्हे तर तरुणीने लग्नास नकार दिल्यानंतर जाब विचारण्यास गेलेल्या पोलीस उपनिरीक्षक व त्यांच्या कुटुंबियांना २५ लाखांची खंडणी मागत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या प्रकरणी चकलांबा पोलीस ठाण्यात एकाच कुटुंबातील ९ जणांवर फसवणूक आणि खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक माहिती अशी की, बीड जिल्ह्यात एका पोलीस उपनिरीक्षकाचे लग्न शिरूर का. तालुक्यातील एका तरुणीसोबत जमले होते. तरुणीच्या कुटुंबियांनी मुलीची संमती असल्याचे सांगून १४ डिसेंबर २०२५ रोजी साखरपुडा घडवून आणला. या साखरपुड्यात आणि त्यानंतर मुलीला सोन्या-चांदीचे दागिने, महागडा मोबाईल व वाहनांचा खर्च मिळून पीएसआयच्या कुटुंबियांचे सुमारे ४ लाख रुपये खर्च झाले. मात्र, काही दिवसांनी तरुणीने फोन करून आपली या लग्नाला इच्छा नसल्याचे सांगितले. हा प्रकार पीएसआयच्या कुटुंबियांनी मुलीच्या नातेवाईकांना सांगून ८ एप्रिल २०२६ रोजी बैठक बोलावली.

या बैठकीत मुलीच्या नातेवाईकांनी वाद घालण्यास सुरुवात केली. 'लग्न केले नाही तर मुलाची नोकरी घालवू आणि रस्त्यात गाठून त्याचे हात-पाय तोडू' अशी धमकी त्यांनी दिली. तसेच आमच्या मुलीलासाठी दुसरा पीएसआय मुलगा शोधून द्या आणि लग्नाची तयारीचा खर्च म्हणून २५ लाख रुपयांची मागणी करत खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सदरील पीएसआयच्या भावाने चकलांबा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी मुलगी, तिची आई, वडील, चुलते यांच्यासह ९ जणांवर भारतीय न्याय संहितेच्या कलम ३(५), ३१८(४), ३५२, ३५१(२) आणि ३५१(३) अन्वये गुन्हा दाखल केला असून सहा. पोलीस निरीक्षक सचिन इंगळे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# भाजी विक्रेत्या महिलेच्या घरी जाऊन विनोद मुळूक यांनी दिला मदतीचा हात

बीड । प्रतिनिधी

**शहरातील भाजी मंडई मध्ये काल अतिक्रमण उठवताना एका भाजी विक्रेत्या महिलेवर झालेला अन्याय पाहता अनेकांनी पालिकेच्या कारभारावर रोष व्यक्त केला या सर्व रोषानंतर बीड नगरपालिकेचे उपाध्यक्ष विनोद मुळूक यांनी माणुसकी दाखवत आज त्या भाजीविक्रेत्या महिलेच्या घरी जाऊन साडीचोळी देत मदतीचा हात दिला.**



नगरपालिकेचे कर्मचारी काल त्या भाजीविक्रेत्या महिलेसोबत ज्या पद्धतीने वागले त्याचा सर्व स्तरातून निषेध होत असताना जागरूक नगर परिषदेचे नगर उपाध्यक्ष विनोद मुळूक नगरसेवक महेश धांडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी घरी जाऊन त्या महिलेला धीर दिलाशहरात भाजीविक्रेत्या महिलेबाबत घडलेल्या घटनेने अनेकांच्या मनाला वेदना दिल्या. हातावर पोट असलेल्या, आयुष्यभर कष्ट करून जगणाऱ्या एका वृद्ध भाजीविक्रेत्या महिलेसोबत घडलेला प्रकार संवेदनशील समाजाला कधीच मान्य होणार नाही. या घटनेची गंभीर दखल घेत आ विजयसिंह पंडित यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला. गरीब, कष्टकरी आणि गरजूंवर अन्याय होणार असेल तर तो कधीही सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.आ विजयसिंह पंडित यांच्या सूचनेनुसार उपनगराध्यक्ष विनोद मुळक यांनी संबंधित माऊलीची भेट घेऊन आर्थिक मदत व साडी-चोळी देत तिचा सन्मान केला आणि यापुढे कोणताही त्रास होणार नाही, अशी ग्वाही दिली. यावेळी नगरसेवक महेश धांडे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# वंजारवाडीत मनरेगा कामात भ्रष्टाचाराचा आरोप चौकशी करण्याची बदामराव पंडितांची मागणी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील वंजारवाडी येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) झालेल्या विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे सखोल चौकशीची मागणी केली आहे.

याबाबत बदामराव पंडित यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांना निवेदन दिले आहे. निवेदनात वंजारवाडी गावातील अनेक सिमेंट रस्ते व पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच काही कामे प्रत्यक्षात पूर्ण न होता कागदोपत्री दाखविल्याचा दावा करण्यात आला आहे. निवेदनानुसार, चिरखा वस्तीतील सिमेंट रस्ता, मारोती मंदिर ते येवले यांच्या घराकडे जाणारा रस्ता, वंजारवाडी ते यादव यांच्या शेताकडे जाणारा रस्ता तसेच वंजारवाडी ते रांजणी शिव रस्ता पवार यांच्या शेताकडे ही कामे बोगस दाखवून लाख रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात आला आहे असा आरोप करून, तसेच खालील कामे पुस्तकी मोजमाप करून झालेली नसल्याचाही आरोप करण्यात आला आहे. यामध्ये वंजारवाडी ते शिवाजी चोरमले यांच्या शेतापर्यंत रास्ता एक किलोमीटर, विश्वनाथ पवार ते राजेश हरकुट यांच्या शेतापर्यंत रस्ता एक किलोमीटर, वंजारवाडी तलाव ते विठ्ठल गड विहिरीपर्यंत रस्ता एक किलोमीटर भाग एक , तसेच भाग दोन, वंजारवाडी ते दाभाडे यांच्या शेतापर्यंत एक किलोमीटर आदी कामांचा समावेश आहे.



यामध्ये सुद्धा अनियमित्ता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात उपसरपंच शोभा दिनकर पवार व ग्रामस्थांनी यापूर्वीही गटविकास अधिकारी, गेवराई यांच्याकडे तक्रार दिली होती. मात्र अद्याप कोणतीही ठोस चौकशी झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्हास्तरीय समिती स्थापन करून मनरेगा अंतर्गत झालेल्या सर्व कामांची तात्काळ चौकशी करण्यात यावी व दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी बदामराव पंडित यांनी केली आहे.

# राहुल सोनवणे यांची बीड जिल्हा काँग्रेस अध्यक्षपदी सलग दुसऱ्यांदा फेरनिवड!

केज । प्रतिनिधी

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी राहुलभैया सोनवणे यांची पुन्हा एकदा अत्यंत प्रतिष्ठेची फेरनिवड करण्यात आली आहे. काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस (जनरल सेक्रेटरी) के. सी. वेणुगोपाल यांनी त्यांच्या नियुक्तीचे अधिकृत पत्र जारी केले आहे. राहुलभैया यांच्या या फेरनिवडीमुळे बीड जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, राजकीय आणि सामाजिक स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



राहुलभैया सोनवणे हे राज्यसभेच्या खासदार रजनीताई पाटील यांचे खंदे आणि कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. पाटील घराण्याशी असलेल्या त्यांच्या दीर्घकालीन एकनिष्ठतेची, पक्षाप्रती असलेल्या प्रामाणिक कार्याची आणि कुशल संघटन कौशल्याची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी पुन्हा एकदा त्यांच्या खांद्यावर जिल्हाध्यक्षपदाची महत्त्वाची धुरा सोपवली आहे.

**जनआंदोलनांतील सक्रिय सहभाग आणि सर्वसमावेशक नेतृत्व**

गेल्या कार्यकाळात राहुलभैया यांनी जिल्ह्यात काँग्रेस संघटना तळागाळापर्यंत मजबूत करण्यासाठी मोठे प्रयत्न केले. मराठा आरक्षण आंदोलन, देशातील वाढती महागाई, आणि शेतकऱ्यांच्या विविध ज्वलंत प्रश्नांवर त्यांनी नेहमीच रस्त्यावर उतरून आक्रमक संघर्ष केला आहे. ओबीसी समाजातील लहान-मोठ्या सर्व जाती-जमातींमधील लोकांना एकत्र घेऊन चालण्याची त्यांची हातोटी जिल्ह्यात सर्वपरिचित आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शनिवार, दि. २३ मे २०२६ । पान ७

# पिंपरी चिंचवडमध्ये पहिल्याच पावसात तारांबळ उडाली

**पुणे । प्रतिनिधी**

उकाड्याने हैराण झालेल्या पुणेकरांना आज पावसाने दिलासा दिला. पिंपरी चिंचवड शहरात ही आज दुपारी झालेल्या पावसाने नागरिक सुखावले. उष्णतेपासून काही वेळासाठी काहोईना सुटका झाली. मात्र या वादळी पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे अनेक भागांत मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे सर्वांची एकच तारांबळ उडालेली पाहायला मिळाली. या पावसामुळे काही ठिकाणी झाडे कोसळली तर काही ठिकाणी वाहतूकीची कोंडी झाली होती. त्यामुळे ऐन ऑफीस सुटण्याच्या वेळेला पिंपरी चिंचवडमध्ये पहिल्याच पावसात खोळंबा झाल्याचे पाहायला मिळाले.






शहराच्या वाल्हेकरवाडी परिसरात एक मोठे झाड उभ्या वाहनांवर कोसळले. त्यामुळे गाड्यांचे मोठे नुकसान झाले. मात्र सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. दरम्यान, भोसरी आणि मोशी परिसरातही दोन ठिकाणी मोठी झाडे रस्त्यावर कोसळली. त्याचा फटका थेट वाहतुकीला बसला. त्यामुळे वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली होती. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ युद्धपातळीवर काम करून झाडे हटवली. त्यानंतर रस्ता वाहतुकीसाठी मोकळा केला.

या पार्श्वभूमीवर, महापालिका प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. वादळी वाऱ्याच्या वेळी नागरिकांनी झाडांखाली किंवा उघड्या जागेत उभे न राहता सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, असे प्रशासनातर्फे सांगण्यात आले आहे. दरम्यान उकाड्याने पिंपरी चिंचवडवासीय हैराण झाले होते. जवळपास ३६ अंश तापमानाची नोंद होत झाली होती. त्यात दुपारच्या सुमारास झालेला हा वादळी पाऊस नागरिकांना दिलासा देवून गेला. पण काही वेळातच सर्वांचीच या पहिलाय पावसाने तारांबळ उडवली. मुंबई-बेंगलोर महामार्गावर पावसाळ्यापूर्वीची कामे सुरू असतानाच अचानक पाऊस आल्याने, वाकड येथील शनी मंदिराजवळ महामार्गावर मोठ्या प्रमाणावर पाणी साचले होते. साचलेल्या पाण्यातून वाहने संथ गतीने पुढे जात असल्याने महामार्गावर काही प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. घटनेची गांभीर्य लक्षात घेऊन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून, साचलेल्या पाण्याला जवळच्या नाल्यातून वाट काढून देण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.पाऊस सुरू झाला त्यावेळी ऑफीस सुटण्याची वेळ झाली होती. त्यामुळे अनेक जण ऑफीस आणि त्याच्या आवारात अडकून पडले. पण जे काही लोक बाहेर पडले ते रस्त्यावर अडकल्याचे दिसून आले. काही ठिकाणी रस्त्यावर पाणी ही साचले होते. तर काही ठिकाणी सिग्नल यंत्रणेला ही फटका बसला होता. झाडे कोसळण्याच्या घटना ही यावेळी झाल्या. त्यामुळे पहिला पाऊस जसा दिलासा देणारा ठरला तसाच त्याने सर्वांची तारांबळ उडवली हे मात्र नक्की. मात्र या पावसाने शहरात गारवा निर्माण केला आहे.

# भीमाशंकरमधील विकासकामांवर ग्रामस्थांचा नाराजीचा सूर

**भीमाशंकर । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे मागील ४ महिन्यांपासून सुरू असलेल्या विकास आराखड्यातील कामांवर स्थानिक ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. नियोजनातील त्रुटी, सार्वजनिक बांधकाम विभाग व पुरातत्त्व विभागाचे दुर्लक्ष तसेच कंत्राटदाराच्या मनमानीमुळे कामे संथगतीने सुरू असून, दर्जाकडेही दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.



श्रीक्षेत्र भीमाशंकर येथील सभामंडपाचे काम कमी कालावधीत पूर्ण करून त्याची गिनीज बुकमध्ये नोंद होणार असल्याचा दावा प्रशासकीय यंत्रणेकडून करण्यात आला होता. यासाठी शासन स्तरावर वारंवार बैठका घेण्यात आल्या. मात्र, संबंधित यंत्रणांच्या हलगर्जीपणामुळे ही संधी गमावल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. भाविकांना पवित्र शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी मंदिर ३१ मे रोजी खुले करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली आहे. मात्र, सध्या पायरी मार्ग आणि सभामंडपाची कामे जलदगतीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याचा आरोप होत आहे. तसेच, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुरातत्त्व विभाग आणि संबंधित ठेकेदारांकडून प्रत्यक्ष देखरेख केली जात नसल्याचेही ग्रामस्थांनी सांगितले.ठेकेदाराचा सुपरवायझर दररोज कामांचे जिओ-टॅग फोटो काढून वरिष्ठांकडे पाठवत असून, संबंधित अधिकारी प्रत्यक्ष पाहणी न करता कामांवर लक्ष असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

दरम्यान, भीमाशंकर परिसर मुसळधार पावसासाठी ओळखला जातो. अशा परिस्थितीत ३१ मेपर्यंत मंदिर सुरू करण्याचे आदेश असताना मंदिर परिसर आणि पायरी मार्गावर मोठ्या प्रमाणात राडारोडा तसेच अपूर्ण कामे शिल्लक आहेत.

# रिक्षाचालकांना मिळणार दहा हजार सन्मान निधी



**पुणे । प्रतिनिधी**

धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटोरिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाच्या विविध फायदेशीर योजनांचा लाभ मिळवण्यासाठी ऑटोरिक्षा व मिटर्ड टॅक्सी चालकांनी अधिकृत संकेतस्थळावर आपल्या वाहनांची व स्वत:ची ऑनलाइन नोंदणी करावी, असे आवाहन पुणे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांनी केले आहे.

आनंद दिघे कल्याणकारी मंडळातर्फे ज्या सभासदांनी १ जानेवारी २०२६ रोजी वयाची ६५ वर्षे पूर्ण केली आहेत, तसेच ज्यांनी १ मे, २०२६ पर्यंत या कल्याणकारी मंडळांतर्गत यशस्वीरीत्या ऑनलाइन सभासद नोंदणी पूर्ण केली आहे, अशा पात्र सभासदांना सन्मान निधी योजनेअंतर्गत १० हजार रुपये इतका आर्थिक लाभ दिला जाणार आहे. मंडळाचे सभासद होण्यासाठी अर्जदाराकडे खालील वैध कागदपत्रे असणे आवश्यक आहे. यामध्ये ड्रायव्हिंग लायसन्स, बॅच, वाहन परवाना, शिधापत्रिका, आधार कार्ड, पॅन कार्ड असणे बंधनकारक आहे.

# गोळीबार करणारे आंदेकर टोळीचे पंटर; एकवीरा देवीच्या डोंगरावरून घेतले गुन्हे शाखेने ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

माजी नगरसेवक वनराज आंदेकर खुनातील आरोपी आकाश मस्केचा भाऊ अक्षय याच्यावर गोळीबार करून कोयत्याने वार करणाऱ्या आंदेकर टोळीतील पंटरांना गुन्हे शाखेच्या पथकाने बुधवारी रात्री उशिरा एकवीरा देवीच्या डोंगरावरून पकडले.

आरोपींनी तीन दिवस अक्षय मस्के हा सकाळी किती वाजता रिक्षा घेऊन बाहेर पडतो. तो कुठे कुठे थांबतो, दुपारी तो कुठे फिरतो. तसेच, रात्री केव्हा घरी परततो, याची रेकी केली आहे. त्यांना तो सकाळी बालाजीनगर परिसरातील रिक्षाथांब्यावर थांबल्याचे निदर्शनास येताच त्यांनी तेथे अक्षयवर गोळीबार करून कोयत्याने वार करत हल्ला केला, अशी माहिती पोलिसांनी दिली.

आफ्ताफ शरीफ सय्यद (वय २२, रा. भाग्यदेवनगर, कोंढवा खुर्द), ऋषीप्रसाद मोहन आंबट (वय २१, रा. हमाल तालीम, नाना पेठ), आवेज अशपाक शेख (वय २६, रा. गणेश पेठ), वेदांत श्रीनिवास टेमगिरे (वय १९, रा. भवानी पेठ, पालखी विठोबा चौक), अमन फारूक बागवाले (वय २१, रा. गोल्डन ग्रोस, भवानी पेठ) अशी गुन्हेगारांची नावे आहेत, तर एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे.

अक्षय मस्के याच्यावर हल्ला केल्याप्रकरणी त्याची पत्नी करुणा अक्षय मस्के (वय २२, रा. स्वामी समर्थनगर, आंबेगाव पठार) यांनी सहकारनगर पोलिसांत फिर्याद दिली.वनराज आंदेकरचा खून सोमनाथ गायकवाड टोळीने केला



होता. टोळीयुद्धातून हा खून झाल्यानंतर शहरात खळबळ उडाली होती. कोंढवा भागात गोळीबार प्रकरणात कृष्णा आंदेकरसह टोळीवर मोक्का कारवाई केली होती. त्यामध्ये आवेज शेखचा सहभाग होता. तो मोक्कातून जामिनावर बाहेर आला असून, आंदेकर टोळीचा नंबरकारी (सदस्य) आहे. कृष्णा आंदेकरने या आरोपींना पिस्तूल पुरवले होते, तर आवेजसोबत इतर अटक केलेली मुले ही कृष्णा व स्वराजसोबत असत, या मुलांना घेऊन आवेजने या खुनाचा प्रयत्न केला असल्याचे समोर आले आहे. वनराज आंदेकरच्या खुनाचा सूड घेण्यासाठी आंदेकर टोळीचा प्रमुख बंडू आंदेकरच्या सांगण्यावरून आरोपींनी कट रचून आरोपीच्या भावावर कोयत्याने वार आणि पिस्तुलातून गोळीबार केल्याचे तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणात पाच जणांना अटक करत त्यांना प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एस. एम. सकळे यांच्या न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना २७ मेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. या प्रकरणात अटक केलेल्या पाच आरोपींपैकी बागवाले, टेमगिरे, शेख, सय्यदवर यापूर्वी गंभीर गुन्हे दाखल आहेत. आरोपींनी गुन्ह्यात वापरलेली हत्यारे आणि वाहने जप्त करायची आहेत. त्यांनी गुन्ह्याचा कट कोठे रचला, त्यामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, याबाबत तपास करायचा आहे. त्यासाठी आरोपींना सात दिवसांची पोलिस कोठडी देण्याची मागणी तपास अधिकारी पोलिस निरीक्षक संतोष जाधव आणि सरकारी वकील भाग्यश्री डागळे-संचेती यांनी केली. न्यायालयाने ती मान्य केली.

# आधी जामीन अर्जाला विरोध, आता कोर्टात म्हटलं 'नजरचूक'! विकास लवांडेंच्या अटकेनंतर पुणे पोलिसांच्या कार्यशैलीवर मोठे प्रश्नचिन्ह



**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा प्रवक्ते विकास लवांडे यांच्या अटकेनंतर आता एक अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. जो गुन्हा विकास लवांडे यांनी कधी केलाच नव्हता, तो गुन्हा त्यांच्या नावावर दाखवून पुणे पोलिसांनी गुरुवारी त्यांच्या अटकपूर्व जामीन अर्जाला न्यायालयात जोरदार विरोध केला होता. मात्र, आज पुणे पोलिसांनी न्यायालयात सादर केलेल्या रिमांड रिपोर्टमध्ये 'नजरचुकीने' हा प्रकार घडल्याचे मान्य केले आहे. पोलिसांच्या या अजब कारभारामुळे आता पुणे पोलिसांच्या (झींपश झेश्रळलश) कार्यशैलीबद्दल मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विकास लवांडे यांच्यावर ८ मे रोजी वाघोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात अटक टाळण्यासाठी लवांडे यांनी न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. या अर्जाला विरोध करताना पोलिसांनी लवांडे यांच्यावर यापूर्वी दाखल असलेल्या गुन्ह्यांची (गुन्हेगारी पार्श्वभूमी) माहिती न्यायालयासमोर ठेवली होती.

या माहितीमध्ये पोलिसांनी २०१७ साली पुण्यातील बिबवेवाडी पोलीस ठाण्यात लवांडे यांच्यावर एक गुन्हा दाखल असल्याचा दावा केला होता. वास्तविक पाहता, २०१७ मध्ये लवांडे यांनी नथुराम गोडसेच्या विरोधात आंदोलन केल्याबद्दल त्यांच्यावर गुन्हा (क्र. ३२/१७) दाखल झाला होता, जो २०२२ मध्ये शासनाने मागे घेतला होता. मात्र, पोलिसांनी न्यायालयात ३२/१७ ऐवजी गुन्हा क्रमांक ३३/१७ दाखवला. हा गु.न्हं. ३३/१७ चक्क 'गौतम कांबळे' नावाच्या दुसऱ्याच आरोपीचा होता, ज्याने दारू पिऊन गोंधळ घातला होता. विशेष म्हणजे त्या गुन्ह्यातून कांबळे यांचीही निर्दोष मुक्तता झालेली आहे. हाच दुसऱ्याचा गुन्हा पोलिसांनी लवांडे यांच्या नावावर दाखवण्याचा प्रयत्न केला. यामुळे पुणे पोलिसांच्या कार्यशैलीबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, विकास लवांडे हे गेल्या काही दिवसांपासून राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चांगलेच चर्चेत आहेत. 'वारकरी संप्रदायात काही लोकांची घुसखोरी झाली आहे', असा दावा करत लवांडे यांनी सोशल मीडियावर काही वारकऱ्यांची एक यादी प्रसिद्ध केली होती. या प्रकरणावरून त्यांच्यावर तीव्र टीका झाली होती आणि काही दिवसांपूर्वी पुण्यात त्यांच्यावर शाईफेक देखील करण्यात आली होती. या शाईफेकीनंतर शरद पवार यांच्या पक्षातील कार्यकर्त्यांनी लवांडे यांचा दुग्धाभिषेक केला होता. या प्रकरणानंतर पोलिसांनी त्यांना काल (गुरुवारी) अटक केली होती. शरद पवार यांच्या पक्षाकडून विकास लवांडे यांना जाणीवपूर्वक आणि खोट्या गुन्ह्याखाली अडकवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. लवांडे यांना अटक केल्यानंतरचा एक फोटोही समोर आला होता, ज्यामध्ये ते गाडीत पोलिसांच्या शेजारी बसलेले दिसून आले होते.

# महाराष्ट्र हा केवळ भूप्रदेश नाही तर भारतीयांच्या स्वाभिमानाचा विषय; छत्रपती वृषाली राजे भोसले यांचे प्रतिसादन

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र हा केवळ एक भूप्रदेश नाही तर छत्रपती शिवाजी महाराजांचे कर्तृत्व, छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान आणि स्वराज्य स्थापनेत योगदान दिलेल्या अनेक मावळ्यांच्या त्यागाचे प्रतीक म्हणून तो भारताच्या स्वाभिमानाचा विषय आहे.




मराठा साम्राज्य ही देशाच्या इतिहासातील प्रेरणादायी बाब आहे. त्यामुळे मराठा साम्राज्याचा नकाशा एनसीईआरटीच्या पुस्तकांमध्ये पुन्हा समाविष्ट झालाच पाहिजे, अशी आग्रही मागणी सातारा गादीच्या प्रतिनिधी छत्रपती वृषाली राजे भोसले यांनी केली. या मोर्चात इतिहास संशोधक, अभ्यासक यांच्यासह विविध संघटना, संस्थाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. एनसीईआरटीने हिंदी आणि इंग्रजी माध्यमांच्या पुस्तकातून मराठा साम्राज्याचा नकाशा काढून टाकला आहे. याबाबत राज्यभरात तीव्र प्रतिक्रिया उमटली. खुद्द राज्य सरकारने पत्र देऊन देखील एनसीईआरटीने अद्याप त्याची दखल घेतलेली नाही. या बाबीच्या निषेधार्थ छत्रपती वृषाली राजे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली या महाराष्ट्र धर्म मोर्चाचे आयोजन करण्यात आले. लाल महालापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. एनसीईआरटीकडून पाठ्यपुस्तकातील मराठा साम्राज्याचा नकाशा हटवून दैदीप्यमान इतिहासाला लपवण्याचा आणि खोटा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न केला जात आहे. छत्रपती घराण्यासह संपूर्ण महाराष्ट्राकडून आपण त्याचा निषेध करीत आहोत, असे छत्रपती वृषाली राजे यांनी यावेळी नमूद केले.

# मुलांना संतांचे ज्ञान, शास्त्रांचे ज्ञान आणि देशी खेळांचे महत्त्व समजले पाहिजे : शिवचैतन्य महाराज मोरे

**पुणे । प्रतिनिधी**

समस्त ग्रामस्थ आंबळे, जनसेवा प्रतिष्ठान आंबळे व पंचवेद वारकरी शिक्षण संस्था, श्री क्षेत्र देहु यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आठ दिवसीय भारतीय संस्कृती संस्कार शिबिराचा उत्साहात समारोप संपन्न झाला. १४ मे रोजी सुरू झालेल्या या शिबिराची सांगता २२ मे रोजी संत तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज ह.भ.प. शिवचैतन्य महाराज मोरे देहुकर, ह.भ.प. भगवान महाराज जाधव तसेच कीर्तनकार ह.भ.प. कृष्णा महाराज पैठणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.




या संस्कार शिबिरामध्ये आंबळे गावातील सुमारे ८० मुलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शिबिरात मुलांना वारकरी संप्रदायाची ओळख, हरिपाठ, भजन, कीर्तन तसेच भारतीय हिंदू संस्कृतीचे महत्त्व आणि श्रेष्ठत्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना हरिपाठ, श्रीमद्भगवद्गीता पाठ, हनुमान चालीसा पाठ, विश्वप्रार्थना, पसायदान, अभंग, गवळणी, शास्त्रातील सदविचार तसेच वारकरी संप्रदायातील संस्कारांचे मोल याबाबत सखोल मार्गदर्शन मिळाले. समारोप प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना ह.भ.प. शिवचैतन्य महाराज मोरे देहुकर म्हणाले, मुलांना संतांचे ज्ञान, शस्त्रांचे ज्ञान आणि देशी खेळांचे महत्त्व समजले पाहिजे. तसेच जीवनातील सर्वात मोठे कार्य म्हणजे खरा माणूस होणे हे साध्य झाले पाहिजे. ह.भ.प. भगवान महाराज जाधव यांनी आपल्या मनोगतात, किंमत वयाला नसते, किंमत वागण्याला असते, असे सांगत मुलांना संस्कारांचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमास उपसरपंच अजित जगताप, ग्रामविकास फाऊंडेशनचे राजेंद्र दरेकर, भगवान दरेकर, दिलीप जगताप तसेच जनसेवा प्रतिष्ठानचे सहकारी व ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार अजित जगताप यांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# 'नीट' पेपरफुटी प्रकरणात पुण्यातील मुख्याध्यापिका मनीषा हवालदार निलंबित; सीबीआयची कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

देश पातळीवर सध्या गाजत असलेल्या वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशाच्या 'नीट' पेपर फुटी प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) पुण्यातून मनीषा हवालदार या शिक्षिकेला अटक केली आहे. फडके हौद परिसरातील सेठ हरिलाल सराफ प्रशालेच्या मुख्याध्यापिका असणाऱ्या हवालदार यांच्यावर तातडीने निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.





मनीषा हवालदार यांचे एम.एस्सी बी.एड असे शिक्षण झाले आहे. त्या सुरवातीला शिवाजीनगर येथील मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. त्यानंतर १९९२ च्या सुमारास विद्या प्रसारिणी सभेच्या भारत इंग्लिश स्कूल कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षिका म्हणून रूजू झाल्या. याच महाविद्यालयात १९९२ ते २०२४ पर्यंत त्या शिक्षिका म्हणून भौतिकशास्त्र विषय शिकवत होत्या. त्यानंतर सेवाज्येष्ठतेनुसार त्यांना फडके हौद परिसरातील सेठ हरिलाल सराफ प्रशालेत मुख्याध्यापिका म्हणून पदोन्नती देण्यात आली. त्या ३० जून २०२६ रोजी सेवानिवृत्त होणार होत्या.

दरम्यान, 'सीबीआय'ने अटक केल्याचे समजताच सभेच्या नियामक मंडळाची तातडीने बैठक बोलविण्यात आली. बैठकीत हवालदार यांनी केलेल्या गैरकृत्याचा निषेध नोंदविण्यात आला. स्वातंत्र्यपूर्ण काळापासून कार्यरत असणाऱ्या संस्थेत गोर-गरिब विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. गेल्या शंभर वर्षांच्या इतिहासात अशाप्रकारे कृत्य कोणत्याही शिक्षकांकडून झालेले नाही. हवालदार यांच्या कृत्याचा निषेध करण्यात येत आहे. 'सीबीआय'ने अटक केल्याचे समजल्यानंतर तातडीने हवालदार यांचे निलंबन केले आहे. त्याची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन केली आहे, अशी माहिती प्रशालेचे सचिव डॉ. सतीश गवळी यांनी दिली.

# राजू शेट्टी अन् सदाभाऊ खोत यांची 'चाय पे चर्चा', ऊसदर आंदोलनाचे निमित्त, एकाच टेबलवर गप्पाचा फड

**बारामती । प्रतिनिधी**

एकेकाळी ऊस आंदोलनाच्या मैदानात खांद्याला खांदा लावून लढणारे, मात्र नंतरच्या काळात राजकीयदृष्ट्या एकमेकांपासून दुभंगलेले दोन मोठे नेते अनेक वर्षांनंतर जाहीरपणे एकत्र आल्याचं पाहायला मिळालं. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी (ठरर्क्षी डहशींीळ) आणि रयत क्रांती संघटनेचे अध्यक्ष आमदार सदाभाऊ खोत (डरवरलहरी घहीं) यांनी इंदापूर न्यायालयाच्या आवारात एकत्र येत चहाचा आनंद घेतला.




या दोन्ही दिग्गज नेत्यांमध्ये गेल्या काही वर्षांत मोठे राजकीय मतभेद निर्माण झाले होते. मात्र, आज अचानक हे दोघे एकाच टेबलवर बसून चहा पिताना आणि गप्पा मारताना दिसल्याने उपस्थित शेतकरी कार्यकर्त्यांसह महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळातील अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. राजू शेट्टी आणि सदाभाऊ खोत हे इंदापूर येथे राजकीय कारणास्तव नाही, तर एका जुन्या आंदोलनाच्या केसच्या तारखेसाठी एकत्र आले होते. २०११ साली महाराष्ट्रात उसाला योग्य दर मिळावा यासाठी राज्यभर अतिशय तीव्र ऊस आंदोलन झाले होते. या आंदोलनादरम्यान राजू शेट्टी आणि सदाभाऊ खोत यांच्यासह अनेक आंदोलक कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल झाले होते. याच खटल्याच्या सुनावणीसाठी शुक्रवारी इंदापूर सत्र न्यायालयात तारीख होती. इंदापूर सत्र न्यायालयातील कामकाज संपल्यानंतर एक धक्कादायक पण सुखद चित्र पाहायला मिळालं. राजू शेट्टी आणि सदाभाऊ खोत यांनी कोर्टाबाहेर येत एकाच हॉटेलच्या टेबलवर, एकत्र बसण्याचा निर्णय घेतला. दोन्ही नेत्यांनी एकत्र चहाचा आस्वाद घेत जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि काही वेळ मनमोकळ्या गप्पा मारल्या. अनेक वर्षांनंतर हे दोन जुने सहकारी जाहीरपणे एकत्र आल्याने कोर्टाच्या आवारात कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. राजू शेट्टी आणि सदाभाऊ खोत यांच्या या चहाच्या भेटीनंतर राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चा सुरू झाल्या आहेत. आजची ही भेट केवळ न्यायालयीन कामकाजापुरती आणि तारखेपुरती मर्यादित होती की भविष्यातील नव्या राजकीय समीकरणांची नांदी आहे, याबाबत आता तर्कवितर्क लावले जात आहेत.